


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ३४ | सोमवार दि. १६ ऑगस्ट २०२१ ते रविवार दि. २२ ऑगस्ट २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

## अभ्यास कर म्हणताच भयंकर संताप आला मुलीनेच गळा आवळून आईचा खून केला



नवी मुंबई/राजेंद्र वेदांते

पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी गेलेल्या आजकालच्या तरुण पिढीवर आई–वडिलांनी किती जरी चांगले संस्कार केलेले असले तरीही ते संस्कार त्यांच्या जीवनाला योग्य दिशा देऊ शकत नाहीत. याचे कारण आजची मुले ज्या वातावरणात वाढलेली असतात ज्या मित्र मैत्रिणींच्या संगतीत राहिलेले असतात तिथे त्यांना स्वच्छंद स्वैराचारी कोणतीही बंधने नसलेले जीवन जगण्याचा एक वेगळा पण रंगीन जीवनाचा एक मार्ग सापडलेला असतो आणि याच मार्गावरील क्षणिक सुखाच्या मोहात जेंव्हा हि तरुण मुले अडकतात तेंव्हा त्यांना कशाचीही परवा करावीशी वाटत नाही. अशावेळी रक्ताच्या नात्याचाही त्यांना विसर पडतो. त्यामुळे आपले आई–वडील आपल्या भल्याचा विचार करून आपल्या आयुष्याला एक चांगला आकार देण्याचा प्रयत्न करीत हे सुद्धा त्यांच्या लक्षात येत नाही. उलट आई–वडिलांची त्यांच्या भल्यासाठी चाललेली तळमळ म्हणजे आपल्यावर एक प्रकारे दबाव आहे असे त्यांना वाटू लागते आणि त्यातूनच मग हा दबाव झुगारण्यासाठी मुले बंडखोर बनतात. आई–वडिलांचं ऐकत नाहीत त्यांच्या मनाविरुद्ध वागतात. आई–वडील जणू काही आपले शत्रू आहेत असं जेंव्हा त्यांना वाटू लागते, तेंव्हा जन्मदात्या आईचा किंवा वडिलांचा काटा काढायलाही ती मुले मागे पुढे पाहत नाहीत.

नवी मुंबईतील रबाळे येथे राहणाऱ्या एका आईला आपल्या मुलीने डॉक्टर व्हावे असे वाटत होते. त्यासाठी तिने नीटच्या परीक्षेचा चांगला अभ्यास करावा या उद्देशाने ती सतत तिला समजावत असे. पण मुलगी मात्र आईच्या या समजावण्याला दाद देत नव्हती. आईचे हे समजावणे म्हणजे तिच्यासाठी एक प्रकारे डोक्याला ताप होता. त्यातून दोघींची भांडणे होत असत आणि याच भांडणातून एकेदिवशी या माथेफिरू मुलीने कराटेच्या बेल्टने आईचा गळा आवळून जन्मदात्या मातेची हत्या केली. ती एवढ्यावरच थांबली नाही, तर आपल्यावर संशय येऊ नये म्हणून आईच्या आवाजात मामला फोन करून आपण आत्महत्या करीत




असल्याचे सांगितले. मात्र पोलिसांनी तिचा हा बनाव हाणून पाडीत तिला अटक केली. आपल्या मुलीला सतत आभ्यास कर हि समज देणे खूपच महागात पडले आहे. नवी मुंबईत १५ वर्षीय मुलीने कराटे बेल्टने गळा आवळून आईची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

३० जुलै रोजी ऐरोलीत ही घटना घडली. आईने अभ्यासाचा तगादा लावल्याने मुलीने आईची हत्या केल्याचं समोर आलं आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी पीडित ४१ वर्षीय शिल्पा जाधव हि महिला वारंवार मुलीच्या मागे लागली होती. यामुळे दोघींमध्ये जोराचं भांडण होत होते. आई आणि मुलीमध्ये सतत वाद होत होते. अशा वेळी मुलगी आईवर भारी पडत होती. तरीही मुलीला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगून असणाऱ्या शिल्पा जाधव या आपल्या १५ वर्षीय मुलीला सतत अभ्यास कर म्हणून तिच्या मागे तगादा लावत होत्या. आईची हत्या केल्याची ही घटना ...पान २ वर

## प्रियकराने प्रेयसीची हत्या केली पत्नीच्याही खूनाची कबुली दिली



मयत मनिषा



मयत संध्या



सातारा/क्राईम रिपोर्टर



आरोपी नितीन

कोणताही गुन्हा कधीच लपून राहत नाही. कधीना कधी त्याला वाचा फुटते आणि आरोपी कितीजरी शातीर असला तरी पोलीस त्याला शोधून काढतात. कारण पोलीस नेहमीच गुन्हेगाराच्या दोन पावले पुढे असतात. गुन्हा करणाऱ्याने कितीही सफाईदार पद्धतीने गुन्हा केलेला असला तरी काहीना काही पुरावा मागे राहिलेला असतो आणि तोच पुरावा पोलिसांसाठी तपासाचा धागा बनतो. वाई तालुक्यातील व्याजवाडी–व्याहाळ येथील नितीन गोळे याने अगोदर अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या पत्नीचा खून केला आणि नंतर लग्नासाठी तगडा लावणाऱ्या प्रेयसीला मार्गातून हटवले. मात्र पोलिसांनी नितीनला प्रेयसी संध्या शिंदे हिच्या खुनाच्या आरोपाखाली अटक करताच त्याने पत्नीच्या हत्येचीही कबुली दिली.

वाई तालुक्यातील व्याजवाडी–व्याहाळ येथे नितीने गोळे हा आपल्या पत्नी मुलासह राहयला होता. गेल्या वीस एक वर्षापूर्वी त्याचे मनिषा बरोबर लग्न झाले होते. नितीन हा मिलट्रीत काही वर्ष नोकरी करून तो परत आपल्या गावी आला होता. त्यांनतर तो मिळेल ते काम करीत होता. सध्या तो माथाडी काम करीत होता. खरे तर लग्नानंतर त्याचे मनिषा बरोबर पटत नव्हते. कोणत्या ना कोणत्या कारणातून नवरा बायकोचे भांडण हे होत होते. या भांडणात तो मनिषाला मारहाण ही करीत होता.त्याला कारण ही तसेच होते. कारण मनिषा हिला आपल्या नवऱ्याचे म्हणजे नितीनचे बाहेरख्याली संबंध समजले होते. ती त्याला विरोध करत होती. नितीन हा कारे येथील संध्या शिंदे या महिलेच्या विवाहबाहय संबंधात पडला होता. ते दोघे ही बाहेरख्यालीपणाने मजा मारत होते. याचा राग नितीनची पत्नी मनिषा हिला येत होता. एक तर नितीन हा घरात लक्ष देत नव्हता. तसेच तो घरखर्चाला ही पैसे देत नव्हता. त्याच्या बाहेरख्याली स्वभावामुळे तो संध्यावरच जास्त पैसे खर्च करीत होता. संध्या ही त्याला आपल्या पदराला बांधून घेतल्यासारखे तिने त्याला ठेवूनच घेतले होते. संध्या ही त्याला आपण लग्न करूया म्हणून त्याच्या मागे लागली होती. मनिषाला सोडल्याशिवाय त्याला संध्याबरोबर लग्न करता येणार नव्हते. मनिषा ही ...पान २ वर

## लंबू म्हणताच मित्र चिडला भर रस्त्यात मुडदा पाडला

भिवंडी/आकाश गायकवाड



मयत सन्नाटा

मस्करी कधी कधी माणसाच्या जीवावर बेतू शकते. त्यामुळे मस्करी करताना माणसाने समोरच्याचे मन दुखावणार नाही अशा पद्धतीने माणसाने मस्करी करायची असते. भिवंडीत दोन मित्रांमध्ये मस्करी वरून झालेल्या भांडणात एकाचा जीव गेला. केवळ ये लंबू म्हणून हक मारल्याने चिडलेल्या तरुणाने आपल्या मित्रालाच भोसकले. या घटनेने भिवंडीत खळबळ माजली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

मित्रांमध्ये मस्करी सुरु असतानाच 'ये लंबू' म्हणणे एका मित्राच्या जीवावर बेतल्याची घटना समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे लंबू म्हणताच आरोपी मित्राने चाकूने भोसकून भररस्त्यातच मित्राची हत्या केली. ही घटना भिवंडीतील नुरीनगर परिसरात घडली आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करीत पोलिसांनी ३ आरोपींना ताब्यात घेतले आहे. समीर शेख (वय, २१ रा, आजाद नगर, भिवंडी) या मुख्य आरोपीसह दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांचा एक साथीदार फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहे. तर मोहंमद अजगर शेख उर्फ सन्नाटा (वय २०, नुरीनगर, भिवंडी) असे हत्या झालेल्या मित्राचे ...पान २ वर

## जमिनीचा वाद त्यांच्या प्राणावर बेतला दोन बहिणींचा जावायानेच जीव घेतला



औसा/शिवाजी मोरे

संपत्तीचे वाद शक्य तितक्या लवकर मिटवायचे असतात. पण ते जर का लवकर मिटले नाहीत, तर मात्र त्या वादातून एखाद्याचा बळी जाण्याची शक्यता असते आणि आजकाल धन संपत्ती जमीन जागा याचा लोकांना इतका मोह असतो कि ते नात्यागोत्याचाही विचार करीत नाहीत. अशाच एका लोभी माणसाने संपत्तीच्या वादातून सौ आणि तिच्या बहिणीचे अपहरण करून त्यांचे तुकडे तुकडे करून ठार मारले आणि शेत तळ्यात टाकले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला मुंबईतून अटक केली आहे.



मयत शेवंताबाई



मयत त्रिवेणीबाई





आरोपी राजू

७ जलै २०२१ रोजी औसा तालुक्यातील किल्लारी पोलिस ठाणे हाद्दीतील मौजे गोटेवाडी येथे शेतवस्ती करून राहणाऱ्या दोन वृध्द महिला अचानक बेपत्ता झाल्याची खबर किल्लारी पोलिस ठाण्यात येवून धडकली. त्रिवेणीबाई सगन सोनवणे (८५) व शेवंताबाई ज्योतिराम सावळकर (८०) अशी या दोघींची नावे होती. या दोघी नात्याने सख्या बहिणी होत्या. शेवंताबाई सावळकर यांना दोन मुली होत्या.शेवंताबाईच्या दोन्ही मुलींचे लग्न झाले होते. एकीचे नाव अनूसया खरटमोल होते तर दुसरीचे नाव सुकमार नारायणकर होते. तर त्रिवेणीबाई सोनवणे यांना एक मुलगा व एक मुलगी होती. त्रिवेणी बाईचा मुलगा नवनाथ सगन सोनवणे...पान २ वर

## कुख्यात गँगस्टर पोलिसांच्या जाळ्यात फसला ऑलंपिक पदक विजेता सुशीलकुमार वाचला



गुन्हेकथा/लक्ष्मणराव पाटोळे

कुख्यात गुन्हेगारांना पकडण्यासाठी कधी कधी पोलिसांना अशी काही नामी शक्कल लढवावी लागते कि तो गुन्हेगार सहजपणे पोलिसांच्या जाळ्यात अडकतो. उत्तर भारतातील अनेक राज्यात खंडणी, अपहरण, खून यासारखे गंभीर गुन्हे करणारा काला जठेडी याला पकडण्यासाठी पोलिसांनी चक्क जेलमध्ये बंद असलेल्या त्याच्या साथीदाराला गुपचूप मोबाईल पुरवला आणि त्यानंतर जठेडी व त्याच्या साथीदाराचे फोन कॉल्स ट्रेस करून या खतरनाक आरोपीच्या मुसक्या आवळल्या. विशेष म्हणजे जठेडी पकडला गेल्यामुळेच सध्या खुनाच्या आरोपाखाली तिहार तुरुंगात असलेला ऑलंपिक पदक विजेता पहेलवान सुशीलकुमार याचे प्राण वाचले. कारण जठेडी याच्या भाच्यालाही सुशील कुमार याने बेदम मारले होते. त्यामुळे सुशील कुमारचा गेम करण्यासाठी जठेडी टपून बसला होता. ...पान ६ वर

## कर्जबाजारी दारुड्याने घर विकायला काढले संतापलेल्या भावाने त्याला यमसदनी धाडले



बेळगाव/क्राईम रिपोर्टर



ज्या माणसाला दारूचे व्यसन लागते तो माणूस कर्जबाजारी होऊन देशोधडीला लागतो आणि त्याच्यामुळे कुटुंबाची सुद्धा वाताहत होते. त्याच्या व्यसनाचे दुष्परिणाम त्याच्या कुटुंबाला भोगावे लागतात. खानापूर जवळच्या लक्ष्मी नगर मध्ये राहणाऱ्या बसवराजचे सुद्धा असेच झाले. त्याला दारूचे व्यसन असल्याने तो कर्जबाजारी झाला होता. त्यामुळे त्याला कर्ज देणारे वसुलीसाठी दारात येऊ लागले. सावकारांच्या याच वसुलीच्या तगाद्याला कंटाळून त्याने घर विकण्याचा निर्णय घेतला होता. पण घर विकायला आईचा आणि धाकट्या भावाचा विरोध होता. त्यातून भांडणे होऊ लागली आणि एकेदिवशी बसवराजने आईवर हात उचलताच धाकट्या भावाने त्याचे कुऱ्हाडीने तुकडे केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

बेळगाव गोवा रोडवरील खानापूर जवळील मच्छे येथे लक्ष्मीनगर येथे तळवार कुंटूंब राहते. बसवराज तळवार, राजू तळवार आणि त्याची आई शिवाक्का तळवार असे तिघे जण एकत्र राहत होते. शिवाक्का तळवार या पूर्वी नर्स म्हणून काम करीत होत्या. लक्ष्मीनगर येथे त्याचे जुने घर होते. कर्नाटक सरकार आश्रय योजनेतून गरजू लोकांना घरे बांधून देत असल्याने तळवार कुंटूबियाने ही त्याच्या राहत्या जागेवर आश्रय योजनेतून चांगले घर बांधले आहे. राजू तळवार याचे लग्न झाले असल्याने तो पत्नी आईला घेऊन राहत होता. बांधलेल्या घरात दोघा भावांची वाटणी झालेली होती. एका घरात राजू तर दुसऱ्या घरात बसवराज हा राहत होता. तो वयाची ४० शी ओलांडली तरी अजून अविवाहित होता. याला कारण ही तसेच होते. तो त्याच्या मित्राच्या संगतीमुळे दारूच्या ...पान ६ वर

## पोपटाशी सोयरीक करून फसगत झाली मुलाला ठार मारून आत्महत्या केली

नाशिक/ललितकुमार खरे






बाई म्हटली कि तिला जगण्यासाठी पुरुषाच्या आधाराची गरज असते. खास करून विधवा महिलेला समाजात जगणे खूपच अवघड असते. कारण एकीकडे पोटापाण्याची चिंता असते, तर दुसरीकडे शारीरिक भूक स्वस्थ बसू देत नाही. संगीताच्या बाबतीतही असेच झाले. पतीच्या निधनानंतर सात वर्षांच्या मुलाला घेऊन जीवन जगणे वाटते तितके सोपे नव्हते. म्हणून तिने वनारवाडी येथील पोपट पवार याच्याशी सुत जुळवले आणि मुलाला घेऊन त्याच्या सोबत राहू लागली. सुरवातीचे काही दिवस चांगले गेले, पण नंतर पोपटला दारूचे व्यसन जडले आणि तो दारूच्या नशेत तिचा छळ करू लागला आणि शेवटी याच छळाला कंटाळून तिने मुलाला ठार मारून आत्महत्या केली.

नाशिक जिल्ह्याच्या चांदवड तालुक्यातील मंगरूळ येथे संगिता पती व मुलांसह गुण्यागोविंदाने नांदत होती. तिच्या लग्नाला एक तप अर्थात बारा वर्ष झाली होती. लग्नाला एक तप पुर्ण झाल्यानंतर एके दिवशी संगिताच्या पतीचे अकाली निधन झाले. पती निधनानंतर संगिता एकाकी झाली होती. एकाकीपण तिला ...पान ६ वर

## लाच प्रकरणातून हत्येचा उलगडा झाला पोलिसांना पकडून देणारा खुनी निघाला



परभणी/क्राईम रिपोर्टर

अपघाताच्या प्रकरणाचा तपास हा अत्यंत काळजीपूर्वक करायचा असतो. कारण कधी कधी काही लोक एखाद्याला ठार मारून अपघाताचा बनाव करीत असतात आणि हे लोक पोलिसांच्या अवती भवती वावरत असून सुद्धा पोलिसांना त्यांचा संशय येत नाही. परभणीत अशाच एका घटनेत २ कोटींच्या लाच प्रकरणात फिर्यादी असलेला एक इसम खुनाच्या प्रकरणातील प्रमुख आरोपी होता. याचा तब्बल एक वर्षाने उलगडा झाला आणि या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक केली.

काही दिवसांपूर्वी परभणी जिल्ह्यातील सुलू येथील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यासह अन्य एका पोलीस कर्मचाऱ्याला २ कोटी रुपये लाच मागितल्याप्रकरणी अटक केली होती. या प्रकरणातील फिर्यादीच आपल्या मित्राचा खुनी निघाला आहे. आरोपीनं ...पान ६ वर

C M Y K

16 TO 22 AUGUST 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:21 PM Page 1



## पान १ वरून....

### अभ्यास कर म्हणताच भयंकर ...

३० जुलै रोजी घडली असली तरी, गेल्या आठवड्यात मुलीने हत्येची कबुली दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. रबाळे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तीन दिवसांपूर्वी मुलीने आईविरोधात तक्रार दाखल करण्यासाठी पोलिसांशी संपर्क साधला होता. यानंतर पोलिसांनी तिच्या पालकांना समुदेशनासाठी बोलावलं होतं. पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, मुलीने नीट परीक्षेसाठी तयारी करावी यासाठी महिला तिच्या मागे लागली होती. मुलीने डॉक्टर व्हावं अशी त्यांची इच्छा होती. ३० जुलैला परीक्षेच्या तयावरीवरुन दोघींमध्ये पुन्हा एकदा भांडण झालं. मुलीने आईला जोरदार धक्का दिला, त्यानंतर शिल्पा या बेडवर पडल्या. तेंव्हा त्यांच्या डोक्याला जखम झाली. यानंतर मुलीने कराटे बेल्ट आईच्या गळ्यात टाकून तो करकचून आवळण्यास सुरुवात केली. तशी आईची शेवटची धडपड सुरू झाली. तरीही तिला आईची दया आली नाही. अखेर काही काळानंतर तिची आई शांत झाली. आई गेल्याची खात्री पटल्यानंतर तिने आईच्या गळ्यातील तो बेल्ट काढला. आईची हत्या केल्यानंतर मुलीने आईचा मृतदेह बेडवर ठेवला आणि आत्महत्या दर्शवण्यासाठी आईच्या मोबाइलवरुन मामाला मेसेज पाठवला. मी सर्व प्रयत्न केले, पण आता माघार घेत असं तिने मेसेजमध्ये लिहिलं होतं, अशी माहिती रबाळे पोलिसांनी दिली आहे. शवविच्छेदन केलं असता गळा दाबल्याने मृत्यू झाल्याचं उघड झालं. महिला पोलीस कर्मचाऱ्याने मुलीला विश्वासात घेतलं असता तिने हत्येची कबुली दिली, असं अधिकाऱ्याने सांगितलं आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. आई –वडिलांना ती डॉक्टर होताना बघायचे होते, त्यासाठी तिने खूप अभ्यास करावा आणि सीईटी मध्ये चांगले गुण मिळवावे म्हणून तिच्यासाठी ट्युशन लावली, तिला हवे नको ते पाहिले. पण तिने अभ्यास करावा म्हणून आई तिला सतत ओरडायची, मात्र तिला आईने ओरडणे आवडत नव्हते. अखेर तिने आईला कायमची संपवण्याचा निर्णय घेतला. शेवटी तिने आईची हत्या केली. मुख्य म्हणजे ही आत्महत्या वाटावी म्हणून आईच्या मोबाईलवरून मामा, वडील आणि मावशीला मेसेज केले. मात्र शवविच्छेदन अहवालात हत्या झाल्याचे उघड होताच रबाळे पोलिसांनी १५ वर्षाच्या मुलीविरुद्ध हत्या आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिल्पा जाधव (४१) असे हत्या करण्यात आलेल्या आईचे नाव आहे. शिल्पा या पती, १५ वर्षाची मुलगी आणि ६ वर्षाच्या मुलासह नवी मुंबईतील ऐरोली सेक्टर नंबर ७ येथे एका इमारतीत राहण्यास होत्या. मुलीने डॉक्टर व्हावे, अशी आई वडिलांची इच्छा होती. नुकतीच मुलगी दहावीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली होती. मात्र चांगले कॉलेज मिळावे, सीईटी मध्ये चांगले गुण मिळावेत, यासाठी वडिलांनी सीईटीसाठी ट्युशन लावले होते. मुलीने अभ्यास करावा व चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावे म्हणून आई शिल्पा मुलीला सतत अभ्यास करण्यासाठी ओरडत असायची. ३० जुलै रोजी दुपारी शिल्पाच्या मोबाईल क्रमांकावरून आय ट्राइड एव्हरीथिंग आय क्वीट' असा मेसेज शिल्पा हिचा भाऊ शैलेश, पती आणि बहिणीला दुपारी अडीज वाजण्याच्या सुमारास करण्यात आला होता. दरम्यान जवळच राहणारा भाऊ शैलेश यांनी बहिणीच्या घरी धाव घेतली असता १५ वर्षाची भाची आणि ६ वर्षाचा भाचा हे दोघे घरी होते. दोघे रडत होते व आई बेडरूमचे दार उघडत नाही, असे सांगितले असता भाऊ शैलेश याने बेडरूमचे दार लाथ मारून तोडले आणि आत प्रवेश केला. तेव्हा बहीण शिल्पा बेडवर निपचित पडली असल्याचे दिसले. तिच्या गळ्याभोवती कराटेचा बेल्ट फास लावलेल्या अवस्थेत होता. शैलेशने शिल्पाच्या गळ्याभोवती असलेली बेल्टची गाठ सोडवली आणि या घटनेची माहिती रबाळे पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन शिल्पाला ताबडतोब वाशी येथील महानगर पालिकेच्या रुग्णालयात आणले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. शवविच्छेदन अहवालात शिल्पा यांचा मृत्यु गळा आवळून झाला असून तिच्या डोक्याला जखम असल्याचे म्हटले होते. म्हणजे शिल्पाने आत्महत्या केली नसून हत्या झाल्याचे जवळ जवळ उघड झाले होते. मात्र ही हत्या कोणी व का केली हा प्रश्न पोलिसांपुढे उभा राहिला.

पोलिसांनी तपास सुरू करून चौकशी सुरू केली. शिल्पा यांची १५ वर्षाची मुलीच्या वागण्यात पोलिसांना संशय आला, म्हणून पोलिसानी तिच्यावर लक्ष ठेवले. अखेर तिला विश्वासात घेऊन तिच्याकडे चौकशी सुरू केली असता तिने गुन्हयाची कबुली दिली. आई मला सतत अभ्यासावरून ओरडत असायची आणि मारहाण करायची, त्यामुळे आमच्यात नेहमी वाद होत होते. ३० जुलै रोजी आई मला ओरडत बेडरूममध्ये आली आणि आमच्यात झटापट झाली आणि त्यात मी आईला जोरात धक्का देऊन लोटले. त्यात आईच्या डोक्याला बेडचा कोपरा लागला आणि आणि बेशुद्ध पडली, त्यानंतर मी कराटेचा बेल्ट घेऊन आईचा गळा करकचून आवळला. काही वेळातच आई शांत झाली. ती कायमचीच. या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी आईने आत्महत्या केल्याचा बनाव मी रचला. तो बनाव खरा वाटावा म्हणून मी तिच्याच मोबाईलवरून वडील, मामा आणि मावशीला मेसेज केला, अशी कबुली ताब्यात घेतलेल्या १५ वर्षीय मुलीने पोलिसांना दिली. तिचा जबाब ऐकून पोलीस देखील हादरले. रबाळे पोलिसांनी याप्रकरणी मुलीविरुद्ध आईचा खून व पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली आहे. तिची रवानगी महिला बाल सुधारगृहात करण्यात आली.

### प्रियकराने प्रेयसीची हत्या केली...

त्याला सहजासहजी सोडायला तयार नव्हती. ती त्याच्यां लग्नाची बायको होती. भांडणात ती त्याला मी काय पळून पाठ लागून आली नाही. तुम्हीच त्या बाईचा नाद सोडा आणि घराकडे मुलाबाळाकडे लक्ष दया म्हणून सांगत होती. परंतू नितीन हा संध्याच्या प्रेमात इतका आकंठ बुडाला होता की तिच्या शिवाय त्याला काही सुचत ही नव्हते. मनिषा ही त्या दोघांच्या संबधातील अडथळा ठरत होती. म्हणून संध्यानेच नितीनला मनिषाला आपल्या संबंधातून बाजुला कर असे सांगितले. संध्याच्या सांगण्यावरून नितीन हा पत्नी मनिषाचा खून करायला ही तयार झाला. तसे ती त्याला नकोच होती. तो संध्यालाच आपली पत्नी मानत होता. शिवाय मनिषाला सोडा म्हणून संध्या ही त्याचे मागे हात धुवून लागली होती. दोन बायकाच्या कात्रीत तो सापडला होता.म्हणून अखेर त्याने पत्नी मनिषा हिचा कायमाचा काटा काढायचा असे ठरविले. त्यानुसार त्याने एक प्लॅन केला आणि या प्लॅनला त्याने सुमारे अडीच वर्षापूर्वी मृत स्वरूप दिले. दि.१ मे २०१९ रोजी त्याचे पत्नी मनिषा सोबत संध्या हिच्या कारणातून जोरदार भांडण झाले. नेमकी हिज संधी हेरून त्याने भांडणात मनिषा हिचा गळा आवळून घरला. ती त्याला प्रतिकार करत होती. परंतू त्याच्या ताकदीपुढे तिचे काही चालले नाही. क्षणार्धात ती टाचा घासून जागीच मरण पावली. ती मयत झाल्याची खात्री होताच नितीन हा थोडासा मनातून घाबरला, परंतू त्याने वेळ न दवडता तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरविले. तसे त्याने प्रियेसी संध्या हिच्या सांगण्यावरून आधीच ठरवले होते. पत्नी मनिषा हिचा मृतदेह घेऊन तो त्यादिवशी रात्रीच्या सुमारास गावाजवळच्या वैराटगडच्या पायथ्याशी गेला. तेथे त्याने तीस फुट खोल ओघळीत एक खड्डा काढून तिचा मृतदेह पुरून टाकला. ही घटना त्याला आणि त्याची प्रियेसी संध्या या दोघांनाच माहित होती. त्यामुळे या घटनेचा कुठे गवगवा होण्या आधी नितीने गोळे याने वाई पोलीसात त्यावेळी पत्नी मनिषा नितीन गोळेट (वय ३५) ही बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. ही तक्रार दाखल झाली तरी मनिषा हिचा काही लवकर शोध लागला नाही. उलट नितीन हा पोलीसांना वेगवेगळी तर्क संगत माहिती देवून पोलीसांची दिशाभूल करीत होता ही गोष्ट लवकर त्यावेळी पोलीसांच्या लक्षात आली नाही. तो सांगेल त्या माहितीवरून पोलीस बेपत्ता मनिषा हिचा शोध घेऊ लागले होते. काही महिन्यानंतर पोलीसांचा हा शोध थंड बस्त्यात पडला. नेमके हेच नितीन याच्या पथ्यावर पडले होते. पत्नीचा खून करून आणि पुरवा नष्ट करून तो नामनिराळा आणि बिनधास्त राहिला होता. कुणाला कशाची ही भनक लागली नव्हती. मनिषाच्या नातेवाईकांना ही त्यावेळी या घटनेकडे फारसे गांभीयाने लक्ष दिले नव्हते. त्याना आपल्या जावायाचे बाहेरख्याली लफडे माहित नव्हते. परंतू विवाहबाहय संबध हे कितीही काळ लपले तरी ते एक ना एक दिवस उघड होत असातात. त्यातच संध्या आणि नितीन याचे झाले होते. संध्या ही नितीनला लग्न कर म्हणून मागे लागली होती. आता या कारणातून त्या दोघांची भांडणे होऊ लागली होती. पत्नी मनिषाचा खून करून अडीच वर्ष होऊन गेली होती. पोलीस ही त्याच्यापर्यंत पोहचले नव्हते. सगळे काही आलबेल झाल्यासारखे होते. म्हणून संध्या ही त्याला लवकर लग्न कर म्हणून त्याच्या मागे लागली होती. परंतू संध्याबरोबर लग्न केले तर लोकांच्या नजरेत आपण येवू आणि कदाचित मनिषाचा खून ही उघडकीस येवू शकतो याची भिती नितीन याला होती म्हणून तो तिच्याबरोबर लग्न करू इच्छीत नव्हता. तो तिला आपण लव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहूया म्हणून सांगत होता. पण ती मात्र त्याचे काही ऐकत नव्हती. तिला त्याच्याबरोबर लग्न करायचे होते. तिने ही नितीनबरोबरच्या संबंधातून नवरा विजय याला सोडले होते. ती एका दवाखान्यात नर्स म्हणून काम करू लागली होती. यातच त्या दोघांचे संबंध वाढीस लागले होते. त्या दोघांचे विवाहबाहय संबंध बहुतेक सगळ्यांना अलिकडे कळून चुकले असल्याने संध्या ही त्याला लग्नासाठी तगादा लावीत होती. तो मात्र तिच्याशी लग्न करायला तयार नव्हता. त्याला फक्त तिचे मस्तपैकी शरीर उपभोगयाला पाहिजे होते. त्या एका कामासाठीच तो तिच्याकडे जात होता. परंतू अलिकडे ती ही त्याला आपल्या शरीराला हात लावू देत नव्हती. त्यामुळे त्या दोघांचे ही फारसे काही पटत नव्हते. दि.३१ जुलै२०२१ रोजी संध्या हिला नितीन याने भेटायला बोलावून घेतले. तिला आपण लग्न करूया म्हणून तिची समजूत काढत तिच्याशी शरीरसुख उपभोगले. त्यानंतर परत त्या दोघांत या कारणातून भांडण सुरू झाल्यावर ती त्याला नको नको ते बोलत होती. याचा राग नितीन याला आला. त्या भांडणात त्याने संध्या हिचा ही गळा दाबून धरला त्यातच ती तडफडत गुदमरून मरण पावली. ती मेल्याची खात्री होताच नितीन याने तिच्याही मृतदेहाची विल्हेवाट लावायची असे ठरविले. त्यानुसार त्याने वाई तालुक्यातील आसले गावच्या हद्दीत ऊसाच्या शेतात नेवून तिचा मृतदेह टाकून दिला. रात्रीच्या अंधारात त्याने तिच्या जवळ काही आहे का नाही याची चाचपणी ही केली नाही. तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावून तो तेथून घाई घाईत निघून गेला. दि.३१ जुलैला घरातून निघून गेलेली संध्या लवकर घराकडे परत आली नसल्याने तिच्या घरच्या लोकांनी ती बेपत्ता झाल्याची तक्रार भुईज पोलीसांना दिली होती. कामावर जातो असे सांगून ती निघून गेल्याचे तक्रारीत म्हटले होते. पोलीस बेपत्ता संध्या शिंदे हिचा शोध घेत असताना ऊसाच्या शेतात एका महिलेचा मृतदेह पडला असल्याची माहिती मंगळवार दि.३ ऑगस्ट २०२१ रोजी भुईज पोलीसाना मिळाली होती. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. घटनास्थळी मृतदेहाच्या शेजारी मयताचे आधारकार्ड तसेच इतर कागदपत्रे पोलीसांना मिळाली होती.त्यानुसार सापडलेल्या मृतदेह हा सौ.संध्या विजय शिंदे (वय३२) हिचा असल्याचे पोलीसांना समजले.तिचा गळा आवळल्याच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या.तसेच तिचे हातपाय ही बांधलेले होते.तिच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा ही स्पष्ट दिसत होत्या.पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सातारा येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देवून तपासाला सुरूवात केली. तिचा खुन कुणी केला आणि कशासाठी केला याचा तपास पोलीस करत असताना सौ.संध्या शिंदे हिचे मोबाईल कॉल पोलीस तपासत असताना तिच्या मोबाईलवरती गेल्या काही दिवसापासून नितीन गोळे या इसमाचा फोन येत असल्याचे दिसून आले. नितीन आणि संध्या याचे विवाहबाहय संबंध असल्याची माहिती पुढे आल्याने पोलीस त्या अनुषंगाने तपास करीत होते. घटना घडल्यापासून नितीन हा फरारी होता.तांत्रीक मुद्दयाच्या अधारे पोलीस या घटनेचा तपास करत असताना पोलीसांना गुप्त खबऱ्याने खबर दिली की, या घटनेतील संशयीत आरोपी नितीन गोळे हा कर्नाटकातील बेळगाव जवळीत एका गावात त्याच्या नातेवाईकांच्या इथे लपून बसला आहे. वरिष्टांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसाचें एक पथक त्याच्या शोधासाठी बेळगावला रवाना करण्यात आले.भुईज पोलीसांनी तेथे त्याचा शोध घेवून त्याच्या नातेवाईकांच्या घरातून त्याच्या मुसक्या आवळ्या. घटना घडल्यापासून अवघ्या काही तासात पोलीसांनी संध्या शिंदे हिच्या खूनाचा तपास करून नितीन शिंदे याला ताब्यात घेतले होते. त्याच्याकडे पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्याने संध्या शिंदे हिच्या खूनाची कबुली देत असताना सुमारे अडीच वर्षापूर्वी आपण आपली पत्नी मनिषा गोळे हिचा देखील खून केल्याचे व तिचा मृतदेह वैजारवाडी डोंगराच्या पायथ्याशी पुरला असल्याची माहिती त्याने पोलीसांना दिल्यावर पोलीसांच्या ही भुवया उंचावल्या होत्या. पोलीसांनी त्याला वैजारवाडी येथील वैजारवाडी येथील डोंगरपायथ्याशी नेवून त्याने दाखविलेल्या ठिकाणावरून जेसीबीच्या सहाय्याने खड्डा उकरून मृतदेह बाहेर काढला.मृतदेहाचे अवषेश शिल्लक असल्याने पोलीसांनी जागीच तलाठी आणि आरोग्य अधिकाऱ्याच्या समोर मृतदेहाचा पंचनामा केला. पत्नी आणि प्रियेसीचा खून केला तरी नितीन गोळे याच्या चेहऱ्यावरची लकेर देखील हलली नव्हती. पोलीसांनी त्याला या दोन्ही गुन्हयात अटक करून त्याला ताब्यात घेतले होते. मनिषा नितीन गोळे (वय ३५) आणि संध्या विजय शिंदे (वय ३२) याचा खून करून पुरवा नष्ट केले प्रकरणी नितीन आनंदराव गोळे (वय ३८) याच्या विरोधात या दुहेरी खूनचा गुन्हा भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे नोंदवून त्याला सातारा येथील मा.कोटासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला दहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास पोलीस उपाधीक्षक धीरज पाटील, वाईच्या उपविभीय पोलीस अधिकारी शीतल जानवे–खराडे आणि स.पो.नी. अशिष कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषनेचे रविराज वेर्णकर, प्रसाद दुदस्कर, तुकाराम पवार,अतुल आवळे, शिवाजी तोरडमल, आनंदराव भोसले, बापुराव धायगुडे,प्रियांका कदम, दीपाली गिरीगोसावी यांनी केला. बायको आणि प्रियेसी या दोघी कधीच दोघी एकत्र आणि एकाच म्यानात दोन तलवारी म्हणून राहु शकत नाहीत दोघीत बेबनाव हा होत असतोच त्यातच प्रियेसी जर शातीर आणि हुशार असली की तो तिच्याच सल्लयाने वागत असतो नितीनने ही आधी प्रियेसीच्या सांगण्यावरून पत्नी मनिषाचा खून केला. नंतर ती त्रास देवू लागल्यावर तिचा ही खून करून पुरावा नष्ट केला. त्याने हे दोन्ही खून नेमके कोणत्या कारणातून केले हे जरी पोलीसांना सांगितले नसले तरी प्राथमिक तपासात मात्र पोलीसांच्या म्हणण्यानुसार त्याने विवाहबाहय संबंधातूनच पत्नी आणि प्रियेसीचा खून केल्याचे कबुल केल्याचे पोलीसांनी सांगितले आहे.

### लंबू म्हणताच मित्र चिडला...

नाव आहे. मृतक मोहंमद अजगर हा कुटूंबासह भिवंडीतील नुरी नगर परिसरात राहतो. काही दिवसापूर्वी मृतक व आरोपी समीर मध्ये काही कारणावरून वाद होऊन भांडण झाले होते. त्यातच काल रात्रीच्या सुमारास मृतक मोहंमद अजगर याने आरोपी समीर ये लंबू म्हणून जोराने आवाज दिला. यावरून दोघांमध्ये वाद होऊन झटापटी झाली. त्यावेळी आरोपीसह त्याच्या साथीदारांनी भर रस्त्यातच मृतक मोहंमद अजगरला मारहाण करीत त्याच्यावर धारदार चाकूने वार केले. हि घटना पाहून परिसरातील जमावाने आरोपी समीरला पकडून जबर मारहाण केली. जमावाच्या मारहाणीत आरोपी समीरही गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर मुंबईच्या सायन रुग्णालयात उपचार सुरु आहे. मात्र या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून घटनेचे गांभीर्य पाहता परिससरात पोलिसांचा बंदोबस्त वाढविण्यात आला. या घटनेचा आज गुन्हा दाखल करून अधिक तपास पोलीस अधिकारी नितीन पाटील करीत आहेत.

### जमिनीचा वाद त्यांच्या प्राणावर...

हा ठाणे जिल्ह्यातील मिरा रोड परीसरात राहत होता. तो पेशाने वकीली व्यवसाय करत होता. तर मुलगी तुलसाबाई त्रिमुखे ही लग्नानंर औसा येथे आपल्या सासरी राहत होती. त्रिवेणीबाईची मुलगी तुळसाबाई यांना निरोप मिळाला होता की त्यांची आई त्रिवेणीबाई सोनवणे व मावशी शेवंताबाई सावळकर ह्या दि.०७ जुलै २०२१ रोजी संध्याकाळी ७ वाजण्याचे सुमारास गोटेवाडी शिवारातुन अचानक बेपत्ता झाल्या आहेत. तुळसाबाईने नातेवाईकांना संर्पक करून आली आई व मावशीचा शोध चालू केला होता पण या दोघींचा कुठेचठाव ठिकाणा लागत नव्हता. त्यामुळे तुळसाबाई यांनी थेट किललारी पोलिस ठाणे गाठून आपली आई व मावशी गोटेवाडीच्या शेतवस्तीवरून बेपत्ता झाल्या असून त्यांचा शोध घेण्याची विनंती केली. यावरून किललारी पोलिस ठाण्यात वृध्द महिला बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली. घटनेचे गांभिर्य ओळखुन साहयक पोलिस निरीक्षक सुनिल गायकवाड यांनी बिट अमंलदारा यांना घटनेचा प्राथमिक आढावा घेण्याचे आदेश दिले. बिट अंलदारांने गोटेवाडी शिवारातील शेतवस्तीवर जावून बेपत्ता वृध महिलांविषयी अधिक माहीती जाणून घेतली. शेवंताबाई व त्रिवेणीबाई या शेतवस्तीवर एका शेड मध्ये राहत होत्या. त्या दोघींनी गावातील एका शेतकऱ्याला बटईने शेत करण्यास दिले होते. या दोघेच्या शेताशेजारी शेवंताबाईचा जावाई राजू उर्फ त्र्यंबक गुरुसिद्ध नारायणकर यांची जमीन होती. राजू हा शेवंताबाई व त्रिवेणीबाई यांचा सख्खा भाचा होता. तयाच्याकडेही पोलिसांनी अधिक माहीती घेतली असता त्यांनेही गेल्या तिन दिवसापासून माझी सासू व आत्या बेपत्ता आसल्याचे सांगितले. एवढी माहीती घेवून किल्लारी पोलिसांनी सदरील बेपत्ता महिलांचे वर्णन घेवून जिल्हाभरातील व शेजारील जिल्ह्यात पोलिस ठाण्याना संदेश देवून सदरील दोन महिलांचा शोध सुरू केला. आठवडा उलटुनही दोन बेपत्ता वृध्द महिलांचा शोध लागत नसल्याने पोलिसही चक्रावून गेल होते. त्रिवेणीबाई सोनवणे यांचा मुलगा नवनाथ सोनवणे यांनी किल्लारी पोलिस ठाणे गाठून आपल्या मावशीचा व आईचा कोणीतरी घातपात केल्याचा संशय व्यक्त केला. साधे वाटणारे प्रकरण वरचेवर आवघड वाटत आसल्याची जाणीव किल्लारी पोलिस ठाण्याचे साहायक पोलिस निरीक्षक सुनिल गायकवाड यांना होउ लागली. जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलिस अधिक्षक हिमत जाधव, औसा उपविभागीय पोलिस अधिकारी राजेश नवले यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सुत्र किल्लारी पोलिस ठाण्याचे साहायक पोलिस निरीक्षक सुनिल गायकवाड यांच्या हाती देण्यात आले. साहायक पोलिस निरीक्षक सुनिल गायकवाड यांनी या प्रकरणाची सखोल माहीती घेण्यासाठी किल्लारी पोलिसांचे एक पथक तयार केले या पथकात पोउपनी अमोल गुंडे, पोहेका सचिन उस्तुर्गे, पोहेका गौतम भोळे, पोका आबासाहेब इंगळे, पोका प्रदिप येरणवाड, पोका दतात्रय गायकवाड यांचा समावेश करण्यात आला. या पथकाने बेपत्ता दोन वृध्द महिलांचा शोध घेण्यासाठी लामजना व गोटेवाडी गाठून अधिक माहीती जणून घेतली असता. औसा तालुक्यातील लामजना गावाचा मुळ रहिवाशी आसलेले राजू उर्फ त्र्यंबक गुरुसिद्ध नारायणकर याचा विवाह शेवंताबाई ज्योतीराम सावळकर यांची मुलगी सुकमार तिच्यासोबत गेल्या चाळीस ते बेचाळीस वर्षांपूर्वी झाला होता. शेवंताबाई ही राजू उर्फ गुरुसिद्ध नारायणकर यांची सख्खी अत्या होती. नात्या –गोत्याला येण्या–जाण्यासाठी वाट असावी या हेतूने शेवंताबाईने आपल्या मुलीचा विवाह आपल्या भाच्यासोबत करण्याचे ठरवले होते. औसा तालुक्यातील लामजना येथे राजू नारायणकर आणि सुकुमार यांचा विवाह मोठ्या थाटात पार पडला. लग्नानंतर लामजना गावचे मूळ रहिवासी असलेले राजु नारायणकर आपल्या वडिलोपार्जित शेत जमिनी मध्ये काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. दरम्यान लामजना सारख्या छोट्या गावात कामधंदा मिळत नसल्याने आणि शेती व्यवसायत मन लागत नसल्याने राजू उर्फ त्र्यंबक नाराणकर आपल्या पत्नीसह कामानिमित्त मुंबई येथे गेला. सुरुवातीला राजूने मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा गाडा सुरू केला. कुर्ला ,कुलाबा, मानखुर्द, मीरा रोड, भाईंदर अशा ठिकाणी असलेल्या खाजगी कंपन्यात तो काम करू लागला. त्याच्या कामात पत्नी सुकुमार देखील हातभार लावत होती. सुकुमार देखील विविध कंपन्यांमध्ये काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यास नवऱ्याला मदत करत होती. दरम्यानच्या काळात राजू आणि सुकुमार यांना दोन मुले आणि एक मुलगी अशी अपत्ये झाली. अशातच राजूने वाहन चालविण्याचा परवाना देखील काढला होता. तो विविध कंपन्यांमध्ये वाहन चालक म्हणून काम करत होता. मिळेल त्या वेळात तो पार्ट टाईम ऑटो चालकाचे देखील काम करत होता. एकंदरीत राजू आणि सुकुमार यांचा संसार मोठ्या थाटात चालू होता. तसा राजु हा एक मुडी स्वभावाचा असल्याने तो एकाच ठिकाणी टिकून राहात नव्हता. मुले मोठे होत असलेले आणि शिक्षणाचा भार वाढत असल्याने राजू यांची आर्थिक स्थिती वरचेवर खालावत जात होती. लामजना येथील वडिलोपार्जित तीन एकर शेत त्याने बटाईने देऊन टाकले होते. त्यामुळे शेतीतून मिळणाऱ्या पैश्यातून त्याच्या संसाराला थोडा फार आर्थीकअधार मिळत होता. अधून मधून वेळ मिळेल तसा तो मुंबई येथून वर्षाला एक दोन वेळेस लामजना येथे आपल्या घराकडे येत होता. तसेच तो आपल्या शेताकडेही भेट देवून शेतीची काळजी घेत होता. दरम्यान मागील वर्षी जाहिर झालेल्या लॉकडाउनमुळे त्याची कंपनीतील नोकरी गेली होती. तो गेल्या दोन वर्षापासून एकटाच लमजना येथे राहणस आला होता. राजूची पत्नी सुकमार मुंबइतच कामधंद्यामुळे राहिली होती. राजू लामजना येथे राहून तो आपले तीन एकर शेतीत स्वतः करत होता. शेतीला जोड व्यवसाय म्हणून त्यांने शेतात त्यांनी गाई म्हशी देखील पाळून दुध व्यवसाय सुरू केला होता.दरम्यान शेवंताबाई यांना दोनच मुली आसल्याने शेवंताबाई आपले शेंत आपल्या दोघी मुलीच्या नावे करणार होती.पण सगळ शेत शांताबाईन राजूला द्यावे अस राजूला वाटत होत. यावरून शेवंताबाई आणी जावाई राजू नारायणकर यांच्यात अनेकदा वाद झाले आसल्याची माहीती या पोलिस पथकाला मिळाली. लामजना गावातून व बेपत्ता महिलांच्या नातेवाइकाकडून प्राथमिक माहिती हस्तगत केल्यानंतर पोलिसांनी तपासाची दिशा ठरवली. घरातच कुठेतरी पाणी मुरतय असा पक्का संशय पोलिसाच्या मनात निर्माण झाला. बहूतेक शेत जमीनीसाठी कुणीतर या दोन वृध्द महीलेचे अपहरण करून घातपात केल्याचा संशय पोलिसांच्या मनात घर करू लागला.दरम्यान शेवंताई व त्रिवेणीबाई बेपत्ता झाल्याच्या चारपाच दिवसनंतर राजू नारायणकर गावात नसल्याची माहीती पोलिसांनी हास्तगत केली. सासू बेपत्ता झाली तिचा शोध घ्याचे सोडून राजू मुबईला का गेला असाव असा प्रश्न पोलिसांना सतावू लागला. पोलिसांनी राजू नारायणकर याला फोन करून कुठे आहात पोलिस ठाणयात या असा निरोप दिला. पण राजू नारायणकर काही पोलिस ठाण्यात आला नाही.उलट त्यांने आपला मोबाईल कायमच बंद केला. त्यामुळे किल्लारी पोलिसांचा संशय अधिक बळावला. या प्रकरणातील संशयित आरोपी राजू नारायण कर याचा शोध घेणे पोलिसांना गरजेचे वाटू लागले. त्यासाठी किल्लारी पोलिस ठाण्याच्या पथकातील पोउपनी अमोल गुंडे, पोहेका सचिन उस्तुर्गे, पोहेका गौतम भोळे, पोका आबासाहेब इंगळे, पोका प्रदिप येरणवाड, पोका दतात्रय गायकवाड तसेच सायबर शाखेचे गणेश साठे यांना विशेष सुचना देवून संशयीत आरोपी राजू नारायणकर याच्या मागावर पाठवले. या पथकाने मुंबई गाठत पूर्वी राजू नारायणकर काम करत असलेल्या प्रत्येक कंपनीमध्ये राजू नारायणकरची वर्तणुकीची माहिती घेतली. त्याच्यासोबत काम करणाऱ्या व त्यांच्या मित्राने राजू बद्दलची सांगितलेले माहितीमुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला. सध्या राजू कुलाबा येथील नौदल ऑफिसच्या परिसरात काम करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. मात्र किल्लारी पोलिस ठाण्याचे पोलिस पथक शनिवारी मुंबईत दाखल झाल्यामुळे व रविवारी कंपनीला सुट्टी असल्यामुळे राजू नारायणकर मग काढणे पोलीस आवघड झाले. दरम्यान किल्लारी पोलिस ठाण्याचे पथक दसेन दिवस कुलाब्यात राहून संशयीत आरोपीची अधिक चाचपणी केली. सोमवारी राजू नारायणकर त्या परिसरात येताच किल्लारी पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याला किल्लारी पोलिस ठाण्यात हजर करत त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याला विश्वासात घेऊन अधिक माहिती विचारली असता त्यांने आपल्या सासू व आत्या चा खून केल्याची कबुली दिली.व सांगण्यास सुरुवात केली. सासुने सगळ शेत माझ्या नावावर कराव आस राजूला वाटत होत. पण सासू या गोष्टीला तयार नव्हती. ती आपले शेत दोघी मुलीच्या नावे समसमान वाटणी करून देणार होती. यावरून राजू आणी शेवंताबाई यांच्यात वाद झाले होते.त्यामूळे राजूचा शेवताबाईवर बराच राग होता. सात जून रोजी संध्याकाळच्या सुमारास राजू नारायणकर हा आपल्या शेतात म्हशीची धार काढून दररोजच्याप्रमाणे आपली सासू शेवंताबाई सावरकर यांना दूध देण्यासाठी गेला व सासु शेवंताबाई सावरकर यांना शेत माझ्या नावावर कर आस दम भरू लागला. तसेच माझी बायको सुकुमार हिला गावकडे बोलून घ्या. त्यावेळेस शेवंताबाई ने जावयाला विरोध करत सुकुमार हिला बोलून घेणार नाही. तुझा इथे काय काम आहे. तू मुंबईला जा असा सल्ला दिला. सासू आपल्या बायकोला गावाकडे येवू नकोस अस सांगत आसल्यानेच बायको गावाकडे येत नाही. ती आल्याशिवाय शेत आपल्या नावावर होत नाही असा समज राजू नारायणकरला झाला. त्यावेळेस चिडलेल्या राजू उर्फ त्र्यंबक नारायणकर यांनी सासू शेवंताबाई हिच्यासोबत झटापट घालण्यास सुरूवात केली . राजू नारायणकर यांने शेवंताबाईचे डोके धरून भिंतीला जोराने आपटले. शेवंताबाई यांचे डोके भिंतीला आदळल्यामुळे त्यांच्या डोक्यातून कानातून नाकातून रक्तस्त्राव सुरू होऊ लागला. त्या जमिनीवर बेशुद्ध होऊन कोसळल्या. दरम्यानच्या काळात शेवंताबाई यांची बहीण त्रिवेणीबाई तिथे उपस्थित होती. त्रिवेणीबाईने राजू यांना विरोध करताच तिचाही राजू नारायणकर यांनी गळा आवळून आवळण्यास सुरूवात कली. राजूच्या शक्तीपुढे हतबल झालेली त्रिवेणीबाईचा श्वास कोंडला व ती गतप्राण झाली.सासू व आत्याला ठार मारून खून केलेला राजू भानावर आला.त्यांने या दोघीच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी एक कल्पना आखली. आठ दाहा दिवसापुर्वीच राजू नारायणकर याचे एक गाय मरण पावली होती. त्या गाईला त्यांने आपल्या शेताजवळील शेततळ्याच्या एका खड्ड्यात टाकले होते. त्याच खड्ड्यात शेवंतबाई व त्रिवेणीबाईला टाकून खड्डा बुजवण्याची तजबीज केली.त्रिवेणीबाईला एका पोत्यात टाकून पोत्याचे तोंड बांधले. पण शेवंताबाई जर शरीराने जाड– जूड आसल्याने तिचे प्रेत पोत्यात बसत नसल्याने एका कोयत्याच्या सह्याने तिचे दोन तूकडे करून दोन पोत्यात भरले. व शेतळ्यातील खड्ड्यात नेवून टाकले. दरम्यान दुसऱ्या दिवशी जोरात पाऊस पडल्यामुळे पाण्यासोबत माती वाहून तो खड्डा बजून गेला. या तपासात पोलिसांनी रक्ताने माखलेले कपडे, कोयता हास्तगत केला आहे. मयत महिलेचा मुलगा नवनाथ सोनवणे यांनी दिलेल्या जबाबावरुन राजु उर्फ त्र्यंबक नारायणकर यांचे विरुद्द किल्लारी पोलीस ठाणेस कलम ३६४ प्रमाणे दोन्ही महिलेचे अपहरण केले बाबत गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही महिलेचा खुन करुन पुरावे नष्ट करण्याचे उद्देशाने त्याचे तुकडे करुन पोत्यात भरुन गोटेवाडी शिवारातील स्वताचे शेतातील शेत तळ्यात पुरुन टाकल्याचे सांगीतले. यावरून पोलिसांनी दोन्ही महिलेचे पुरलेले प्रेत सदर शेत तळ्यात काढुन दिले. त्यावरुन सदर गुन्हयात कलम ३०२,२०१ भादवी प्रमाने वाढ करण्यात आली. सदर पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी अहोरात्र परिश्रम नमूद आरोपीस अटक केली. यामुळे पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांनी सर्व पथकाचे अभिनंदन व कौतुक केले आहे. सदरची कामगिरी ही, वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सपोनी सुनिल गायकवाड, पोउपनी अमोल गुंडे, पोहेका सचिन उस्तुर्गे, पोहेका गौतम भोळे, पोका आबासाहेब इंगळे, पोका प्रदिप येरणवाड, पोका दतात्रय गायकवाड तसेच सायबर शाखेचे गणेश साठे यांनी अत्यंत परिश्रम घेवुन निष्ठेने केली. सदर आरोपीस मा.न्यायालयाने दि.१४/०७ /२०२१ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड दिला आहे. गुन्हयाचा अधिक तपास किल्लारी पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी सपोनी सुनिल गायकवाड हे करीत आहेत.

16 TO 22 AUGUST 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:22 PM Page 1



# पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते सुमती अजितराव मानेचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील मुलगी शहरी भागात शिक्षण घेऊन परिस्थितीवर मात करत ती शिक्षणात नावलौकीक मिळवत उंच भरारी घेण्याच्या दृष्टीने तीचा माहिती प्रणाली मध्ये मास्टर्स (Masters In Information Systems) या कोर्ससाठी दोन वर्षासाठी अमेरिकेतील तेथील प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्च शिक्षणासाठी निवड झाली. त्या अनुषगाने अमेरिकेला जाण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या किंवा काही अडचणी असतील तर तात्काळ सोडविल्या जातील, असे आश्वासन राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख यांनी दिले. निलंगा येथील वृंदावन मंगल कार्यालयात संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ, अनसरवाडा द्वारा संचलित शिवाजीराव पाटील विद्यालय,अनसरवाडा ता. निलंगा जि. लातूर च्या वतीने कु. सुमती अजितराव माने यांचा सर्व पक्षीय सत्कार सोहळा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी अध्यक्षस्थानी टी.टी.माने हे होते तर



प्रमुख पाहूणे म्हणून आमदार अभिमन्यू पवार, आमदार विक्रम काळे, अशोकराव पाटील, निलंगेकर, माजी आमदार विनायक पाटील, माजी आमदार पाशा पटेल, सभापती पंचायत समिती राधाताई बिरादार, माजी सभापती अजितराव माने, श्रीशैल्य उटगे, शिवाजी माने, सचिन दाताळ, शोभाताई बेजरंगे, पंडीत धुमाळ, अभय साळूंके, लिंबज रेशमे, विजयकुमार पाटील, अरविंद पाटील यांच्यासह तहसीलदार गणेश जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील, गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, नायब तहसीलदार अरुण महापूरे आदिंची उपस्थिती होती. लातूर जिल्ह्यातील कन्या परदेशात शिक्षणासाठी जाते याचा महाराष्ट्राला आनंद आहे. निलंग्या सारख्या तालुक्याच्या मुलीचा क्रमांक शिक्षणासाठी अमेरिकेला लागतो हे किती कौतूकास्पद आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेपासून सुरक्षित राहण्यासाठी मास्कचा वापर करावा. शासकीय यंत्रणा तिसऱ्या लाटेचा मुकाबला करण्यासाठी सतर्क आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी लसीकरण करुन घ्यावे, असे आवाहन पालकमंत्री देशमुख यांनी केले. यावेळी आ.अभिमन्यू पवार, आ.विक्रम काळे, विनायक पाटील, पाशा पटेल, अशोकराव चव्हाण, निलंगेकर, अभय सांळूके, अरविंद पाटील यांनी अभिनंदन व शुभेच्छा देण्यासाठी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दत्ता शहीर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात तुकाराम माने यांनी कु.सुमती मेहनत व चिकाटी आणि आत्मविश्वासच्या जिवावर पुढील शिक्षणात प्राविण्य मिळवावे, अशी अशा त्यांनी व्यक्त केली. कु. सुमतीने सत्काराला उत्तर देतांना म्हणाली की, मी मुलगी असून सुध्दा उच्च शिक्षणासाठी मला एक संधी मिळाली आहे. तिचे सोने करुन दाखवते. माझा सत्कार करुन सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवला आहे तो सार्थ करेन. अभिनंदन आणि शुभेच्छा त्यामुळे मला एक प्रेरणाच मिळाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जेवरीकर यांनी केले.

# नांदेडमध्ये गुन्हेगारांच्या टोळीयुद्धाने नागरीक हैराण

**नांदेड/नरेन भारती**



नांदेडकरांसाठी डोकेदुखी ठरलेल्या नितीन बीघानिया या कुख्यात गुन्हेगाराच्या टोळीला पोलिसांनी चांगलाच हिसका दाखवला आहे. या टोळीशी दोन हात करण्याच्या उद्देशाने गेलेल्या पोलिसांना खूप वेळा अपयश आले, पण शेवटी शिताफीने त्यांना जेरबंद केले. नांदेडमध्ये पोलीस दप्तरी सहा गुन्हेगारी टोळ्यांची नोंद आहे. पैकी पोलिसांनी चार टोळ्यांचे कंबरडे मोडले आहे. कैलास बीघानिया आणि विकी चव्हाण या दोन टोळ्यांमध्ये नेहमीच वर्चस्वावरून टोळीयुद्ध भडकले आहे. याच टोळीयुद्धातून बिघानिया या टोळीने विकी चव्हाण याचा गेम केला. या गुन्ह्यात कैलास बिघानिया तुरुंगात आहे. त्यामुळे त्याच्या टोळीची सूत्रे त्याचा लहान भाऊ नितीन कडे आले, तर विकी चव्हाण याचा उजवा हात विकी ठाकूर हा चव्हाण टोळीचा म्होरक्या बनला. आपले सामर्थ्य टिकविण्यासाठी पुन्हा एकदा वर्चस्व युद्ध सुरू झाले. यामुळे नांदेडकर यांची डोकेदुखी वाढली होती. एकमेकांना संपवून नांदेडचे डॉन होण्याचे स्वप्न या टोळ्यांमध्ये चालू आहे. विकी ठाकूर याचा २० जुलै रोजी गेम करून साथीदारांसह जिल्ह्यातून पळून जाण्यात यशस्वी झाले. या प्रकाराने अख्खे पोलीस दल हादरले आणि हे प्रकरण पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी आणि पोलिस अधीक्षक प्रमोद कुमार शेवाळे यांनी ही घटना गांभीर्याने घेत या प्रकरणाचा छडा लावला. सदरील मोहिमेत गुन्हेगार एका इमारतीत बसल्याची माहिती मिळाली याची सत्यता पाहण्यासाठी त्यांनी सापळा रचून सर्वांना एकत्रच पकडले. गुन्हेगारांकडे पिस्टल सह अन्य घातक शस्त्र होती. पुढून गोळीबार किंवा हल्ला होऊ शकतो या दृष्टिकोनातून पोलिसांनीही तयारी केली. आपल्या या अड्ड्यावर पोलीस पोहोचू शकत नाही. हा अतिआत्मविश्वास बिघानिया ला होता परंतु पोलिसांनी दरवाजा ठोठावताच एकाने तो दरवाजा उघडला. समोर पोलीस पाहताच आरोपीना घाम फुटला. क्षणाचाही विलंब न करता गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या. गुन्हेगारांना पोलिसांनी प्रतिकार करण्याची संधी दिली नाही अशाप्रकारे फार मोठी आणि तेवढेच धाडसी मोहीम पार पडली. पण अलीकडील काळात टोळीयुद्ध वाढत चालल्यामुळे व्यापारी आणि सामान्य नागरिक यांच्यात फार मोठी भीती निर्माण झाली आहे. नांदेड पोलिसासमोर फार मोठे आव्हान उभे राहिले आहे. त्यासाठी अवैध धंदे वाढणार नाहीत याची काळजी युद्ध पातळीवर घ्यावी लागणार आहे. तयारच व्यापारी आणि सामान्य नागरीक शांतापूर्ण जीवन जगू शकतील.

# अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळाचे शालेय शिक्षणमंत्री यांच्या हस्ते उद्घाटन

## ऑनलाईन प्रवेशप्रक्रीया राबविण्यासाठी सज्जता

**मुंबई/प्रतिनिधी**



अकरावी प्रवेशासाठीच्या संकेतस्थळाचे उद्घाटन शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या हस्ते आज करण्यात आले. अकरावीच्या ऑनलाईन प्रवेशासाठी शालेय शिक्षण विभाग सज्ज असल्याची ग्वाही यावेळी देण्यात आली. बृहन्मुंबई क्षेत्र, ठाणे, पुणे, नागपूर, अमरावती आणि नाशिक शहरातील सुमारे साडे पाच लाख जागांसाठी ही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. इतर ग्रामीण भागांत प्रचलित पद्धतीने प्रवेश देण्यात येणार आहेत. पहिल्या फेरीची सुरूवात आजपासून होणार असून २२ ऑगस्ट पर्यत विद्यार्थ्यांनी नोंदणी करायची आहे. दि. १७ ते २२ ऑगस्ट या दरम्यान सिट ची उपलब्धता बघता येईल त्याचप्रमाणे प्राधान्यक्रम भरता येणार आहे. दि. २३ ते २५ ऑगस्ट दरम्यान मेरिट लिस्ट लागेल. दि. २७ ते ३० ऑगस्ट दरम्यान महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे. दुसऱ्या फेरीची प्रक्रिया दि. ३१ ऑगस्टला, तिसरी फेरी दि. ५ सप्टेंबरला, चौथी फेरी दि. १२ सप्टेंबरला होणार आहे. विद्यार्थ्यांना https://11thadmission.org.in या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश घेता येणार आहे.

# विनायकराव पाटील यांची ई-पंचायत मॉलला भेट



**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर येथील ई-पंचायत मॉल या दालनास माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांनी भेट देऊन इ पंचायत मॉल च्या संचालकांना शुभेच्छा दिल्या. अहमदपूर शहरातील थोडगा रोडवर चालू असलेल्या इ पंचायत मॉलला भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी सदीच्छा भेट दिली असता तालुक्यातील व जिल्ह्यातील ग्रामपंचायत, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, यांच्या विकास कामासाठी लागणाऱ्या वस्तू एकाच छताखाली मिळवून देणारे दालन ई-पंचायत मॉल असल्याचे यावेळी माजी मंत्री विनायकराव पाटील यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. मागील तीन वर्षांपासून सदरील इ पंचायत मॉल तालुका व जिल्हास्तरावर विविध कार्यालय, शाळा व विकासकामासाठी १४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या माध्यमातून साहित्य पुरवल्याणे लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी यावेळी समाधान व्यक्त केले. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती रोहिदासजी वाघमारे, वैजीनाथ गिरी, शिवराज पाटील,कमलाकर पाटील, सभापती प्रशांत पाटील,गोविंदराव गिरी, नगरसेवक राहुल शिवपुजे, सरपंच महेश ढाकणे, संग्राम नरवटे, अँड. निखिल कासनाळे, श्रीकांत शर्मा, ई पंचायत मॉल चे संचालक अॅड. प्रवीण भुतडा, तुषार हंगरगे, संतोष भोसले,गणेश हलसे,सोहेल शेख, शिवपाल गुरमे आदींची उपस्थिती होती.

# वाडा नगरपंचायतीच्या मुख्याधिकारीपदी अजय साबळे

**वाडा/प्रतिनिधी**




वाडा नगरपंचायत एप्रिल २०१७ला अस्तित्वात आली असून आज मितीस चार वर्षाचा काळ निघून गेला आहे. नगरपंचायत स्थापन झाल्या नंतर सुरुवातीच्या काळात वाड्याचे तहसीलदार यांनी मुख्याधिकारी म्हणून काम पाहिले, सहा महिन्यांच्या कालावधी नंतर प्रबोधन मवादे हे मुख्याधिकारी म्हणून नियुक्त झाले होते. त्यांचीही एका वर्षातच बदली झाली. त्या नंतर तीन वेळा मुख्याधिकारी म्हणून तहसीलदार यांनीच काम पाहिले.त्या नंतर काही कालावधीसाठी साळुंखे यांची नेमणूक करण्यात आली होती त्यांचीही बदली झाली.

वास्तविक नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतीच्या माध्यमातून शहराचा जो विकास होणे अपेक्षित होते तो झाला नाही त्याचे हे एक मुख्य कारण असू शकते. नगरसेवक रामचंद्र जाधव यांनी कायमस्वरूपी मुख्याधिकारी मिळण्याची मागणी केली असता त्यांच्या या मागणीला अनुसरून जिल्हाधिकारी यांनी विक्रमगड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अजय साबळे यांना वाडा नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. साबळे यांनी या अगोदर गडचिरोली जिल्ह्यातील मूलचेरा नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी काम केलेले असल्यामुळे ते वाडा नगरपंचायतीच्या विकास कामात हा सध्या वाडा शहराला भेडसावणाऱ्या अनेक समस्या आहेत त्यात प्रामुख्याने पाणी पुरवठा, कचऱ्याचे योग्य नियोजन व प्रभागातील अंतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. नगरपंचायत स्थापनेच्या चारवर्षानंतरही नागरिकांना गढूळ पाणी प्यावे लागत आहे. वाड्यातील एका नगरांमध्ये मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे, तर विवेक नगर, शिवाजी नगर अशा काही भागात पाण्याची टंचाई आहे. डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न अजूनही मार्गी लागलेला नाही.नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांना या समस्यांसह इतरही अनेक समस्यांच्या निवारणाचे काम प्रामुख्याने करण्याचे आवाहन त्यांच्या समोर आहे. वाड्याचे तहसीलदार डॉ.उद्धव कदम यांना तहसील कार्यालयाचे कामकाज हाताळत कोरोनजन्य परिस्थिती वरही नियंत्रण राखण्याचे महत्वाचे काम करावे लागत असल्याने ते नगरपंचायतीला पूर्ण वेळ देऊ शकत नव्हते, परिणामी वाडा नगरपंचायतीचे नगरसेवक रामचंद्र जाधव यांनी पालघरचे जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांच्या कडे पत्रव्यवहार करून कायमस्वरूपी मुख्याधिकारी मिळण्याची मागणी केली होती. अन्यथा १३ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा दिला होता. वाड्याचा खुंटलेला विकास व जाधव यांच्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी गुरसळ यांनी अजय साबळे यांची नियुक्ती केली आहे.

**महाराष्ट्र शासन**

निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथक, नाशिक विभाग,
नाशिक यांचे कार्यालय, पोलीस परेड मैदान समोर शरणपुररोड, नाशिक ४२२००२.
फोन क्र./फॅक्स क्र.०२५३/२३१९७४४. (ई-मेल - ddefsnashikagnal.com)

**जाहिर नोटीस**

ज्या अथा निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभागीय भरारी पथक, नाशिक विभाग, नाशिक यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५.(a).(e) नुसार गन्हा, रजि. क्र २२५/२०१८ दि. १९/११/२०१८ नोंद केला आहे. सदर गुन्हात दारुबंदी गुन्ह्यातील बेवारस मुद्देमाल एक महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप परिवहन क्र. एम.एच.४८ एजी. १७६६ या वाहनाव्दारे वाहतुक करताना जप्त करण्यात आला आहे. सदर बेवारस मुद्देमाल य वाहनाबाबत मा.न्यायालयाकडे अथवा या कार्यालयाकडे कोणत्याही इसमाने कायदेशीर कागदपत्रासह मागणी केलेली नाही अथवा दावा केलेला नाही. सदर वाहनाचा जो कोणी कायदेशीर मालक अथवा दावेदार असेल त्याने सदर जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासुन एक महिन्याच्या आत मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. दिंडोरी कॅम्प सुरगाणा, ता.दिंडोरी, जि. नाशिक अथवा तपासणी अंमलदार यांच्या समक्ष वाहनाचे कायदेशीर कागदपत्रांसह उपस्थित राहून वाहनाचा हक्क स्थापीत करावा अन्यथा सदर वाहन मा.न्यायालयाच्या आदेशान्वये सरकार जमा करुन या विभागाव्दार सदर वाहनाचा जाहीर लिलावाव्दारे विक्री केली जाईल.

सही/-
(ए.डी.पाटील)
दुय्यम निरीक्षक
राज्य उत्पादन शुल्क,
विभागीय भरारी पथक, नाशिक विभाग, नाशिक

जिमाका/पालघर/जाहि २५/३६०/२०२१ दिनांक : १३/०८/२०२१

# चाकूर येथे तालूकास्तरी पुरस्काराचे वितरण



**नळेगांव/प्रतिनिधी**

चाकूर पंचायत समिती येथे महा-आवास अभियान अंतर्गत तालुकास्तरीय पुरस्कार २०२०-२१ उत्कृष्ट घरकुल लाभार्थी, ग्रामपंचायत आणि क्लस्टर यांना मा. सभापती महोदय सौ. जमुनाताई बडे, मा. उप सभापती सज्जनकुमार लोनाळे, सहायक गट विकास अधिकारी गोकनवार.ए.जी यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यावेळी पुरस्कारीत ग्रा.प. चे गामसेवक, सरपंच , सदस्य व कर्मचारी आदि उपस्थित होते. यावेळी उपसभापती सज्जनकुमार लोणाळे यानी लाभार्यांना प्रोत्साहन पर मागदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्रा. गृ. अ. शेंडगे ए एम व आभार प्रदर्शन मणियार. एम. ज े(क.लेखाधिकारी), यांनी केले . घरकुलचे पोतदार. आर. एस, अभियंता किणीकर ए व्ही, शेंडगे ए एम, पोतदार के व्ही, भोसले पी एस व ऑपरेटर शेख आर.ए.यांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास निलेशजी देशमुख, लक्ष्मण तिकटे, लालासाहेब शिंदे, लक्ष्मण कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत



### ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक कक्षाचे सुशोभीकरण

सोलापूर : सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालयातील अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या कक्षाचे नुकतेच आकर्षक असे सुशोभीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे नुतनीकरण करण्यात आलेल्या कक्षाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील व पोलीस अधिकारी पोलीस मुख्यालयातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

### पालकमंत्र्यांची ऑक्सीजन निर्मिती युनिटची पाहणी

लातूर : ग्रामीण रुग्णालय,निलंगा यांच्या आवारात ७० लाख रुपये खर्चून बसविण्यात येत असलेल्या लिक्वीड ऑक्सीजन निर्मिती युनिटची पाहणी राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अमित देशमुख यांनी आज केली.यावेळी श्रीशैल्य उटगे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.एल.एस.देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ.दिलीप सौदंणे, पोलीस उपनिरीक्षक डॉ. कोल्हे, प्रणिता गायकवाड, डॉ. हुगे, डॉ.शेख मौल्ला, तसेच अरुणा सोनार, सहायक अधिसेविका, भाग्यश्री काळे कोव्हीड एनचार्ज यांच्यासह नर्स व अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

### लातूर जिल्हा क्रीडा पुरस्कार जाहिर

लातूर : जिल्हयातील क्रिडा क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या क्रीडा पट्टूंना दि.१५ ऑगस्ट, २०२१ रोजी जिल्हा क्रिडा पुरस्काराने गौरविण्यात येणार असून सन २०१८-१९ या वर्षाकरीता गुणवंत खेळाडू (पुरुष गट) म्हणून महंमद वजीरोद्दीन सदरोद्दीन (तलवारबाजी), गुणवंत खेळाडू (महिला गट) म्हणून कु.शिंदे ज्ञानेश्वरी माधव (तलवारबाजी) व गुणवंत क्रींडा मार्गदर्शक म्हणून डॉ. मोरे अभिजीत शामराव तसेच गुणवंत क्रीडा संघटक / कार्यकर्ता म्हणून प्रा.शरद गणपतराव माने यांना जिल्हा क्रीडा पुरस्कार जाहिर झाला आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी कळविले आहे.

### गुड मॉर्निंग ग्रुपतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

लातूर : गुड मॉर्निंग ग्रुपच्यावतीने सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन अनेक उपक्रम राबविले जातात. त्या उपक्रचाच एक भाग म्हणून १० वी, १२ वी व नीट परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी आरती तिवारी, श्रध्दा काकडे, पृथ्वीराज चव्हाण, सुनिल गायकवाड आदी गुणवंताचा सत्कार केशवराज महाविद्यालयाचे माजी मुख्याध्यापक उमेश सेलुकर यांच्याहस्ते करण्यात आला. यावेळी शिवशाहीर संतोष साळुंके, बीएसएनएलचे अधिकारी हितेंद्र तिवारी, जीएमजीचे अध्यक्ष राजेश कोळी, सचिव बाळासाहेब जाधव, पत्रकार राजु पाटील, कोषाध्यक्ष नागेश गाथाडे, उद्योजक धिरज तिवारी, बँकेचे अधिकारी रेवणसिध्द विभूतवार, उद्योजक साईनाथ लोमटे, जीएमजीचे राज्य उपाध्यक्ष सुशिल गायकवाड, जीएमजीचे लातूर, उस्मानाबाद संपर्क प्रमुख तेजस चव्हाण,शिलरत्न निलंगेकर सोसायटीचे चेअरमन सतीश पवार, एक्सल उद्योगाचे सर्वेसर्वा रंगनाथ चव्हाण, जागृतीचे सतीश वाकडे, जीएमजीचे निलेश कांबळे, विनायक अंधारे, धनंजय कांबळे, काकासाहेब जाधव, गणेश मिरकले, बाळू खेलगवळी, व्यंकट कडणे, सतीश सुवर्णकार, किशोर गायकवाड, संदिप सिरसाठ, अॅड संतोष पाटील, बालाजी भारती सर,शिलरत्न निलंगेकर, भागवतराव काकडे यांच्यासह जिल्हा परिषद परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

### नवीन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

लातूर : जिल्हयातील सर्व शासन मान्यता प्राप्त अनुदानित , विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य व या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी यांना सन २०१९-२० साठी Re-apply करण्यासाठी व सन २०२०-२१ या वर्षासाठी भारत सरकार शिष्यवृत्ती (GOI) व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क (FREESHIP) राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर योजनेचे अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी या पोर्टलवर दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत अंतिम मुदत देण्यात आलेली आहे. जिल्हयातील सर्व प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी यांनी शिष्यवृत्ती चे अर्ज अचूक भरुन मंजूरीसाठी या कार्यालयास दिनांक ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

### जिल्हयातील जेष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण करण्यासाठी आधारवड हे संकेत स्थळ सुरु

लातूर : सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडून थोडेसे माय बापासाठी पण या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व जेष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण करण्यासाठी लातूर जिल्ह्यासाठी आधारवड हे संकेतस्थळ सुरु करण्यात आलेले आहे. या संकेतस्थळावर सर्व्हेक्षण नमुना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सर्व्हेक्षण फॉर्म मध्ये ज्येष्ठ नागरिकांची माहिती भरण्यासाठी आशा वर्कर्स, अंगणवाडी कार्यकर्ती व ग्रामरोजगार सेवक यांचे पश्रळपश प्रशिक्षण पुर्ण करण्यात आलेले आहे. ग्रामीण भागातील सर्व्हेक्षणासाठी काही अडचणी उद्धवल्यास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर व शहरी भागातील सर्व्हेक्षणासाठी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास विभाग लातूर यांचेशी संपर्क साधावा तसेच जिल्ह्यातील ६० वर्ष वयावरील ज्येष्ठ नागरिकांनी सर्व्हेक्षक आपल्यापर्यंत आल्यानंतर आपली संपुर्ण माहिती देऊन सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी लातूर तथा जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण सामिती अध्यक्ष पृथ्वीराज बी. पी. यांनी केले आहे.

16 TO 22 AUGUST 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:22 PM Page 1



# आरक्षणाचा फास!

वर्ण व्यवस्थेच्या वरवंट्याखाली चिरडल्या गेलेल्या तळागाळातील लोकांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळावेत आणि त्यातून हा गरीब उपेक्षित समाज देशाच्या मुळ प्रवाहात यावा या उदात हेतूने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास असलेल्यांना शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची सवलत दिली होती. या मागे बाबासाहेबांचा हेतू शुद्ध आणि प्रामाणिक होता. जर या आरक्षणाची व्यवस्थित अंमलबजावणी झाली असती तर देशातील चित्र आज वेगळे असते. पण तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी आरक्षणाला राजकारणाचा मुद्दा बनवून जाती जातीत भिंती उभ्या केल्या. या मागे त्यांचा हाच हेतू होता की दलीत आदिवासी आणि इतर मागास वर्गीयांची एक मोठी व्होट बँक तयार करून त्याच व्होट बँकेच्या आधारे आपली सत्ता टिकवायची. पण त्यांच्या याच दुष्ट हेतूने आरक्षणाचा खेळखंडोबा केला. कारण आता सगळ्यांनाच आरक्षण हवे आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्या महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय आदी सर्वच क्षेत्रांवर मराठ्यांचा प्रभाव होता. मराठा समाज आर्थिक दृष्ट्या मागास आहे असे कधीही चित्र दिसले नव्हते. कारण सत्ता आणि सत्तेच्या अवती भोवती वावरणारे बहुतांश पुढारी हे मराठा समाजाचे होते, पण सत्तेत राहून या लोकांनी गरीब मराठा शेतकऱ्यांना कोणतीही मदत केली नाही. त्यामुळे भूमिहीन किंवा अल्पभूधारक मराठा शेतकरी कायमचा गरीब राहिला आणि त्यातूनच त्याने पुढे आरक्षणाची मागणी केली. त्यांची ही मागणी कितपत योग्य आहे की अयोग्य आहे हा एक वादाचा आणि स्वतंत्र चर्चेचा विषय बनू शकतो. पण आरक्षणात लाभार्थ्यांची संख्या वाढवण्याचा हा प्रयत्न आणि त्यातून आरक्षणाची मर्यादा वाढविण्याची होत असलेली मागणी ही आरक्षणाच्या मुळ गाभ्यालाच धक्का लावणारी आणि आरक्षणाचा बाजार मांडणारी आहे. दोन दिवसांपूर्वी संसदेत १२७ वी घटना दुरुस्ती विधेयक सर्वानुमते मंजूर झाले. त्यामुळे राज्यातील इतर मागास वर्गातील जातींची सूची तयार करण्याचा अधिकार राज्यांना मिळाला आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मार्ग सुकर झाला आहे, पण एकीकडे एसईबीसीचे स्वातंत्र्य राज्याला देऊन दुसरीकडे ५० टक्क्यांची आरक्षणाची मर्यादा कायम ठेवणे हा दुटप्पीपणा आहे. आणि सरकारच्या याच दुटप्पीपणाच्या विरोधात विरोधक आक्रमक आहे. कारण घटनेतील ५० टक्क्यांची मर्यादा कायम ठेऊन इतर मागास वर्गीयांमध्ये आणखी काही जातींचा समावेश केला तर आरक्षणाची टक्केवारी वाढते आणि वाढलेली ही टक्केवारी सर्वोच्च न्यायालयाला मान्य नाही. अशा तऱ्हेने एकंदरीत आरक्षणाचा खेळखंडोबा सुरू झालाय. त्यामुळे कधी कधी असे वाटते की आरक्षणाबाबत असे वाद निर्माण करून आरक्षण रद्द करण्याचा तर हा प्रयत्न नाही ना! तसे झाले तर या देशातील दलीत, पिडीत, आदिवासी आणि ओबीसी या खऱ्या लाभार्थ्यांची काय हालत होईल याची कल्पनाच करवत नाही. आरक्षणाला वादाचा मुद्दा बनवण्यात सगळ्याच पक्षांचा हात आहे. त्यामुळे जर उद्या आरक्षण रद्द झाले तर गोरगरिबांच्या बरबादीला हे सगळेच राजकीय पक्ष जबाबदार असतील. १२७ व्या घटना दुरुस्तीच्या वेळेस आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करण्याची विरोधकांची एकमुखी मागणी त्यांचा खरा जातीयवादी चेहरा दाखवणारी आहे. यात त्यांचा फायदा होईल, पण आरक्षणाचा जो मुळ उद्देश आणि त्याच्या माध्यमातून मागासवर्गीयांच्या सुरू असलेल्या विकासाला प्रगतीला कुठे तरी खीळ बसेल. हे वास्तव आता मागासवर्गीयांनी समजून घ्यायला हवे. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा शिथिल करून त्यात लाभार्थी जाती जमातींच्या समावेश केल्याने आरक्षण अधिक गुंतागुंतीचे होणार आहे. तेंव्हा सर्व राजकीय पक्षांनी मिळून आरक्षणाचा हा जो काही बाजार मांडला आहे. तो आता गुंडाळावा अन्यथा फार भयंकर परिस्थितीला सामोरे जावे लागेल.

# न्यायालयीन लढाईतही राजभवन जिंकले...!

काही गोष्टी अशा असतात की त्यापुढे न्याय पालिकेचे सुधा काहीच चालत नाही. कारण घटनेतच अशा काही तरतुदी आहेत. की जिथे काही चुकीचं जरी घडत असले तरी न्यायालयालाही काही करता येत नाही. कायद्याची ही विवशता लोक आणि लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. सध्या महाराष्ट्रात सरकार विरूद्ध राज्यपाल असा जो काही वाद सुरू आहे त्या वादाने लोकशाही शासन व्यवस्थेची अशीच कोंडी केली आहे आणि याला कारणीभूत आहे पक्षीय राजकारण! राज्यपाल हे पूर्वी भाजपचे नेते होते आणि आजही त्यांच्यात भाजपचीच विचारसरणी आहे. त्यामुळे सेक्युलर अशी ओळख असलेल्या महाविकास आघाडी बरोबर त्यांचे पटत नाही. परिणामी राजभवन आणि मंत्रालय यांच्या वादात महाराष्ट्रातील प्रश्नांची कोंडी होतेय. राज्य मंत्रिमंडळाने नोव्हेंबर २० मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर केलेला नामनिर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीचा प्रश्न गेले ९ महिने असाच राजभवनात धूळ खात पडला होता. मात्र राज्यपाल त्यावर निर्णय घेत नव्हते. त्यामुळे हा प्रश्न उच्च न्यायालयात गेला.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

किमान न्यायालयात तरी हा प्रश्न सुटेल असे वाटले होते. मात्र सरकारने मंजूर करून पाठवलेल्या यादीला राज्यपालांनी ९ महिने उलटून गेले तरी मंजुरी दिली नाही. याबाबत न्यायालयाने नाराजी जरी व्यक्त केलेली असली तरी राज्यपालांना याबाबत कोणतेही आदेश दिलेले नाहीत. कारण राज्यपालांना आदेश देण्याचा अधिकार न्यायालयाला नसल्याने केवळ ही यादी परिस्थिती पाहून लवकर मंजूर करावी असे न्यायालयाने मत व्यक्त केले आहे. न्यायालयाने या प्रकरणात थेट हस्तक्षेप करण्याबाबत असमर्थता व्यक्त केली आहे. तर दुसरीकडे घटनेने राज्यपालांना दिलेले अधिकार पाहता सरकार एखाद्या कामाबाबत राज्यपाल कोशारी यांच्यावर दबाव आणू शकत नाही, असे केंद्राचे मत आहे. थोडक्यात राज्य सरकारच्या कामात राज्यपाल हस्तक्षेप करू शकतात, पण राज्यपालांच्या कामात सरकार हस्तक्षेप करू शकत नाही असं कायदा सांगतो आणि तसे असेल तर लोकनियुक्त सरकारला काम करणे अवघड होऊ



शकते. गेल्या सव्वा वर्षांपासून महाराष्ट्रात आघाडी सरकार सत्तेवर आहे. पण सरकारच्या स्थापनेपासून राज्यपाल आणि लोकनियुक्त सरकारं यांच्यात कुठल्या ना कुठल्या मुद्यावरून मतभेद सुरू आहेत. आणि त्याचा परिणाम अर्थातच राज्यातील जनतेच्या प्रश्नांवर होतोय. कारण एकीकडे महाविकास आघाडी त्यांची सेक्युलर धोरणे राबवत आहे, तर दुसरीकडे राज्यपाल त्यांची धोरणे पुढे रेटत आहेत आणि त्यात त्यांच्याकडून काही घटनाबाह्य गोष्टीही घडल्या आहेत. मागे एकदा त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात तुम्हाला हिंदुत्वाचा विसर पडला आहे असे मुख्यमंत्र्यांना म्हटले होते. जे पूर्णपणे चुकीचे होते. कारण राज्यपाल हे जरी राज्याचे घटनात्मक प्रमुख असेल तरी त्यांना असा कुठल्या एका धर्माची पाठराखण किंवा समर्थन करता येत नाही. पण कोशारी यांनी हा नियम मोडला. त्यामुळे खरे तर त्याचवेळी त्यांची राज्यपाल पदावरून उचलबांगडी व्हायला हवी होती, पण तसे झाले नाही. त्यामुळे राज्यपाल आणखी धीट झाले. सरकार आपले काहीच करू शकत नाही किंवा घटनेने आपल्याला जे अमर्याद अधिकार दिले आहेत, त्यामुळे न्याय पालिकाही आपले काही करू शकत नाही असे त्यांना वाटतेय म्हणूनच त्यांनी नामनिर्देशित आमदारांची यादी दाबून ठेवलीय हे चुकीचे आहे. राज्यपाल जर असेच वागणार असतील आणि सरकार व न्यायपालिका यांनाही जुमानत नसतील तर राज्यातील जनतेनेच त्यांना बद्दलण्याबाबत राष्ट्रपतींकडे दाद मागावी. कारण राज्यपाल आणि सरकार यांच्यातला संघर्ष अधिक काळ तसाच ठेवणे राज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# जनसामान्यांसाठी लढणारा महायोद्धा...

ग्रामपंचायत ही लोकशाही मंदीराचा पाया असतो. लोकांनी लोकासाठी लोकापयोगी विचाराचा कृतीशिल पाया वास्तवात उतरवणारी व्यवस्था म्हणजे लोकशाही. या लोकशाहीचा लोकप्रतिनिधी कणा असतो. असेच एक लोकप्रतिनिधी बाभळगावच्या काटेरी वनात जन्माला आले. ज्यांनी आपल्या स्वकर्तृत्वांने विकासाची बाग फुलवली व त्याचा सुगंध निरंतरपणे सामान्य जनापर्यंत दरवळत ठेवला. तो लातूर जिल्ह्याच्या क्षितीजावरील तळपता तेजस्वी तारा, महाराष्ट्राचे विकासरत्न, मराठवाड्याचे सुपुत्र व लातूर जिल्ह्याचे निर्माते विलासरावजी देशमुख साहेब होय, साहेबाच्या राजकारणाची सुरुवात त्यांच्या जन्मगावापासून झाली. सन १९७४ साली ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत निवडून आले आणि सरपंच झाले. गल्ली ते दिल्ली हा महाप्रवास इंद्रधनु प्रमाणे चढत व वाढतच गेला. गढीवरून गडावर जाणारे व दिल्ली काबीज करणारे महायोद्धे म्हणजे विलासरावजी साहेब. लोकप्रियता व गुणवत्ता, राजकारण व समाजकारण हे हातात हात घालून चालतात तेव्हांच समाजाचा सर्वांगीण विकास होतो हे साहेबानी दाखवून दिले. महाराष्टाचे मुख्यमंत्री म्हणून ज्यांनी बराच काळ घालवला तो राज्याच्या ह्दयसिंहासनावरती आरूढ झालेले सर्वगुण संपन्न दृष्टे नेते. आपल्या धारदार विचारांनी व कतृत्वांनी, श्रोत्यांच्या मनावरती गारुड घालणारे पट्टीचे वक्ते, साहेब होते. हजरजबाबीपणाचं चालतं बोलतं संगणक ते होते. हजरजबाबी असल्याने विचारपीठावरुन बोलताना त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव जनमाणसावर सहज पडायचा. भाषणाच्या ज्योतिवर शब्दांच्या फुलवाती लावून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करण्याचा त्यांचा हातखंडा होता. श्रोत्यांना खेळवत, खिळवून, ठेवण्याची कलात्मक शैली त्यांच्या भाषणात होती. भाषण करत असताना मधूनच कधी विनोदाची झालर तर कधी कोट्यांची किनार लावल्याने ती अधिक प्रभावशाली व्हायची व श्रोत्यांच्या गळी सहज उतरायची. एखाद्या कसलेल्या अभिनेत्यालाही जितक्या सफाईदारपणानं रंगभुमीवर आपल्या भुमिका वटवता येणार नाहीत. तितक्याच सफाईदारपणानं त्या रंगवल्या. जीवनाचा हा पट अनेक पैलूंनी सप्तरंगी बनवला. व्यक्तीचे भाष्य म्हणजे त्यांच्या व्यक्तीमत्वाचा आरसा असतो. त्यात त्यांच्या व्यक्तीमत्वाचे प्रतिबींब सहज दिसते साहेबांच्या अनेक भाषणातून त्याचा प्रत्यय आला. समाजाला आपल्या कर्तृत्वांनी मोहीत करणारे व विकासाची कास असलेले धुरंधर राजकारणी, शब्दवीर ते कर्मवीर, अशी ज्यांची वाटचाल आहे. ते विलासवीर, दिलेला शब्द पाळणारा व वास्तवात उतरवणारा हुकुमी एक्का असायचे, सामान्य माणसापासून ते उच्चभ्रु पर्यंत सर्वांना हवं हवसं वाटणार लोभस व्यक्तीमत्व. साहेबांचे सारे लक्ष महाराष्ट्राच्या जनतेवरती होतं. जन मनावरती भरभरुन प्रेम करणारा



लोकप्रिय नेता लक्षावधी मैल दुर असलेल्या सुर्याचा प्रकाश आपल्या अंगणात पडावा व त्यातुन उत्साह प्रेम व उर्जा मिळवून नवजीवन निर्माण व्हावे तसं साहेबांच्या जीवनाचा पैलू हा की, ते कोठेही असले तरी त्यांचे सारे लक्ष महाराष्ट्राच्या जनतेवरती होते. दिल्लीत उवजड मंत्री झाले पण मुंबईची आठवण आली की, अवघडल्यासारख व्हायचंय. या मानवतेच्या मानदंडाचे किती कौतुक करावे. दुभळ्या शब्दांचे बुडबुडे किती उधळावे. विलासराव सहोबांचा शेतकर्याकडं पाहण्याचा दृष्टीकोन फारच उदार व सकारात्मक होता. त्यांच्या विचारात व कृतीत व्यापकता व विशालता होती. शेतकऱ्यांविषयी जिव्हाळा व जवळीकपणा होता. अज्ञानाचा आर्धांग वायू झालेल्या शेतकर्यांच्या डोळ्यात नव्या तंत्रज्ञानाचं ज्ञानार्जन घालून डोळस बनवल. नवयंत्र व नवामंत्र याविषयी शेतकरी परिषेदाच्या माध्यमातून प्रभोधन केलं शेतकऱ्यांना त्यांच्या स्वत्वाची जाणीव करून दिली. स्वतःच्या पायावरती उभा राहण्यासाठी मार्ग खुला केला. शेतकर्यांसाठी ६ टक्के व्याजदारांने कर्ज पुरवठा, शेतमजुराला किमान वेतन वाढ व सावकारी विरुद्ध कडक कायदे केले. त्यामुळे शेतकरी व शेतमजुराला दिलासा मिळाला. जस रणरणत्या उन्हात सुकणार्या पिकावरती पावसाची सर पडावी व त्या रोपाला नवसंजीवनी मिळावी, तशी दिन दुभळ्या पिडीत व शोषित शेतकर्याला साहेबांच्या रुपाने आस्थेन विचारपुस करणारा व प्रश्नन मार्गी लावणारा नेता मिळाला. त्यामुळे शेतकर्यांच्या जीवनात आर्थिक क्रांतीची पहाट निर्माण झाली. सत्याला वास्तव जीवनाचा आधार असावा लागतो, अन्यथा प्रतिभा ही अंधारातील आरश्यासारखी निरोपयोगी ठरते. दिलेला शब्द पाळणारा व प्रतिभेचं लेन न्यालेला प्रज्ञावंत नेता अर्थात विलासराव साहेब.

**जो सुख मे साथ देते है वो रिश्ते होते है।**
**और जो दुख मे साथ देते है ओ फरिश्ते होते है।**

कलियुगातील राम लक्ष्मण म्हणून ज्यांचा अवर्जुन उल्लेख करावा असे दिग्गज नेते दिलीपरावजी व विलासरावजी. दिलीपरावजीनी साहेबांना जिवनभर सावलीसारखी साथ दिली. खर तर एखाद्या भव्य मंदिराचा कळस आम्हाला दिसतो पण त्याला आधार देणारा पायाचा दगड मात्र दिसत नाही. सर्वांचे लक्ष शिखराकडेच जाते पण दिमाखाने चकाकणार्या शिखराच्या मुळात भक्कम असा पाया असतो यांची जाणीव नसतं. लोक कळसाचं दर्शन घेतात व पायाची पुजा करतात. एक पायाचे तर दुसरे कळसाचे मानकरी ठरले. विलासराव साहेब नेहमी म्हणायचे. ज्याचा पाया मजबूत, त्याचा कळस शाबुत दिलीपराव हे चंदनासारखी झिजले त्यांच्या नावाचा टिळा लावून महाराष्ट्रभर फिरता आलं. त्यांचा सुगंध सामान्य माणसापर्यंत घेवून जाता आला. या बंधुत्वाच्या प्रेमाचा दिप इतका जबरदस्त होता. की तो कधी विझलाच नाही. ही प्रेमाची दिपज्योती इतकी जबरदस्त होती की, ती नंदादिपासारखी निरंतर तेवत राहीली. कारण तिला आस्थेची वात व प्रेमाच तेल होतं. साहेब म्हणजे काही नवे जुने यांचा मेळ घालून भविष्याचा वेध घेणारा दृष्टा नेता. काही नव्या प्रेरणा घेवून महाराष्ट्राच्या जनतेच्या आकांक्षाची क्षितीजे उंचावणारा जाणता राजा. पुरोगामी विचार सरणीचा देहवादी तत्ववेता, वास्तवतेचं भान व माणुसकीचा ओलावा असलेला प्रणेता. मनात उद्धारता, ह्दयात विशालता व कार्यात तत्परता असलेला तत्पर जागल्या. विकासाची कास व समाजाचा ध्यास धरून निरर्पेक्ष वृत्तीने कार्य करणारा कर्तबगार लोकनेता. एक सफल नेतृत्व. यातूनच साहेबांच बहुमुखी बहुश्रुत व चिंतनशिल व्यक्तीमत्व प्रगट होताना दिसतं.

**जमाने के लिए मै एक बार हूँ।**
**लेकिन जमाना मेरे लिए हजार बार है।**

महाराष्ट्राचा कंठमणी आणि लोकशाही, समाजवादाचा, आशादिप लोकप्रियतेचा लाटेवरती आरुढ झाला असताना व गल्ली ते दिल्ली हा महाप्रवास करताना त्यांच्या नशिबी अनेक संकटे आली. पण त्याला न जुमानता व प्रतिकुल परिस्थिती असताना देखील या राजाने दिल्ली गाठली. सत्तेचा मुकुट मस्तकी चढला पण सत्तेची मस्ती कधी चढली नाही.विकासाचा रथ हाकणारा सारथी रथ गतीमान होत असताना या सारथ्याला काळानेच आपल्या कव्हेत घेतले. सोसाट्याच्या वार्यांने जशी दिपज्योती मालवत जावी किंवा सुर्यास्थाच्या वेळी रात्रीने संधी प्रकाशाला गिळावे, त्याप्रमाणे साहेबांची जीवन ज्योती काळाच्या वादळात कायमची विझली गेली. एखादा जन्मांध गर्दीच्या पळापळीत सापडावा व त्यांच्या हातातील आधाराचे काठी निसटुन जावी जशी साहेबांच्या जाण्याने सामान्य जनाची अवस्था, सैर-भैर अनेकांचे जीवन उद्धवस्त झाले. ते आज आपल्यात नसलेतरी त्यांचे कार्य व जीवन प्रणाली सदैव स्फुर्ती देईल, यात शंका नाही लाखो जनतेचा कैवारी, शेतकर्यांचा वाली व पुरोगामी विचारसरणीचा नेता आम्हा सर्वांना सोडून निघून गेला परत येण्यासाठी नाहीतर अनंत जन्माच्या महाप्रवासासाठी. या लोकमान्य नेत्याच्या अक्षय कार्यास व स्वर्णिम स्मृर्तिस कोटी कोटी प्रणाम!

**– गणपतराव बाजुळगे, चेअरमन श्रीसंत शीरोमणी मारुती महाराज शेतकरी सह.साखर कारखाना बेलकुंड**

# ई-पीक पाहणी प्रकल्प देशासाठी मार्गदर्शक ठरेल - मुख्यमंत्री

येत्या काळात ई-पीक पाहणी मोबाईल ॲप शेतकऱ्यांना आपलेसे वाटेल याबद्दल विश्वास वाटतो. राज्यभरात राबविला जाणारा ई-पीक पाहणी प्रकल्प देशासाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. येत्या स्वातंत्र्यदिनापासून महसूल आणि कृषी विभागाच्या वतीने ई-पीक पाहणी हा संयुक्त प्रकल्प राबविण्यात येणार असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे ई-पीक पाहणी प्रकल्पाचे ऑनलाईन लोकार्पण इलेक्ट्रॉनिक कळ दाबून करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषी मंत्री दादाजी भुसे, महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार, ऑनलाईन पध्दतीने कृषी राज्यमंत्री डॉ.विश्वजीत कदम, मुख्य सचिव सीताराम कुंटे, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जमाबंदी आयुक्त व संचालक निरंजन सुधांशू, टाटा ट्रस्टचे मुख्य सल्लागार जयंतकुमार बांठिया, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनाथ नरसिंहन, ई फेरफार प्रकल्पाचे राज्य समन्वयक रामदास जगताप, यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. मोबाईल ॲपचे ऑनलाईन लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, काही वर्षापूर्वी शेतकऱ्याला स्वत:चा सातबारा पहायला मिळण्यासाठी खूप कष्ट करावे लागत असे, पण आज शेतकऱ्यांना आपला सातबारा मोबाईलमध्ये पाहणे शक्य झाले आहे.काळाप्रमाणे बदलणे हा प्रकृतीचा नियम आहे असे आपण म्हणतो मग बदलत असताना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण नवनवीन प्रयोग करुन शेतकऱ्यांचे कष्ट कमी करण्याबरोबरच त्यांना सोप्या आणि सुलभ पध्दतीने आवश्यक असणारी कागदपत्रे मिळवून देणे, पीकांची




माहिती मिळवून देणे यावर भर देत आहोत याचा आनंद वाटतो. कोणताही नवीन प्रयोग करताना यश तेव्हाच मिळते जेव्हा आपण सर्वजण सांघिक प्रयत्न करतो. आपण सर्वांनी सांघिक प्रयत्न केल्यानेच आता आपल्या शेतकरी बांधवांचे कष्ट कमी होण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले की, आज दररोज हवामानात बदल होतो आहे. कधी अतिवृष्टीमुळे तर कधी पाऊस न पडल्याने पिकांचे नुकसान होते आहे. अशा काळात शासनाला शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई देताना अनेक अडचणी येतात कारण त्यावेळी पंचनामे करणे कठीण असते. पण या डिजिटल प्रणालीमुळे शेतकऱ्यांना अधिक मदत होणार आहे.ई पीक पाहणी प्रकल्पामुळे शेतकऱ्याचे आयुष्य अधिक सोपे आणि सहज करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचा आनंद आहे. विकेल ते पिकेल ही संकल्पना राज्यभरात राबवित असताना आपापल्या जिल्हयाचे वैशिष्ट्य ओळखून एक जिल्हा एक पीक असा ब्रॅड तयार करणे आवश्यक आहे तरच शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही तर हमखास भाव मिळेल. येणाऱ्या काळात शेतकऱ्यांनी पिकविलेला भाजीपाला अधिक दिवस कसा टिकवता येईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांनी शेतीमध्ये काळाच्या पुढे जाणारे प्रयत्न केले तसेच आताही शेतकऱ्यांना नवीन गोष्टी आणि तंत्रज्ञानाची मदत घेऊन त्यांचे जीवन सोपे आणि सुलभ करण्यावर भर देणे आवश्यक आहे.

**ई पीक पाहणी प्रकल्प प्रत्येक कुटुंबाशी जोडला जाणारा–थोरात**

महसूलमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, महाराष्ट्रात राबविण्यात येणारा हा पथदर्शी प्रकल्प असून आजचा दिवस हा ऐतिहासिक आहे. ई पीक पाहणी प्रकल्प हा प्रत्येक कुटुंबाशी जोडला जाणारा प्रकल्प आहे. आज आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे स्वरुप जरी मर्यादित स्वरुपातले असले तरी याचा होणारा परिणाम हा व्यापक स्वरुपातील आहे.टाटा ट्रस्ट मार्फत सुरुवातीला हा प्रकल्प अवघ्या दोन जिल्हयात पथदर्शी प्रकल्प म्हणून सुरु करण्यात आला होता मात्र आता हा प्रकल्प राज्यभरात राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे शेतकरी बांधवांना आपल्या पीकाची माहिती स्वत:च भरणे शक्य होणार आहे. आताच्या डिजिटल युगात शेतकऱ्यांना सहज, पारदर्शक व बिनचूक सुविधा उपलब्ध करण्यासाठी महसूल विभाग कटिबद्ध असून यापुढील काळातही हा विभाग लोकाभिमुख करताना सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबविण्यात पुढे राहील. आज लोकार्पण करण्यात आलेल्या प्रकल्पाची राज्यस्तरावर अंमलबजावणी होणार आहे. तसेच पुढील १५ दिवसात राज्यातील शेतकऱ्यांना आपल्या पीकाची नोंद पवर कशी करायची याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.ऑनलाईन सातबारामध्ये सुलभता आणण्याबरोबरच आता ८ अ सुध्दा ऑनलाईन करण्यात आला आहे. कृषी मंत्री भुसे म्हणाले की, ई- पीक पाहणी प्रकल्प महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरात राबविण्यात येणार असून विकेल ते पिकेल या अभियानाद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प असणार आहे. शेतकऱ्याला स्वत: पिकांची नोंद करता येणार असून शेतीसाठी पीक कर्ज आणि पीक विमा सुलभरित्या उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महसूल राज्यमंत्री श्री. सत्तार म्हणाले की, शेतकऱ्यांना स्वत:च्या शेतातील पिकांची सात बारामध्ये स्वत: नोंद करता येणार असल्याने पीक पेरणी आणि पिकांच्या परिस्थितीचा अंदाज करता येणार आहे. ई पीक पाहणी प्रकल्पामुळे गाव, तालुका आणि जिल्हानिहाय प्रत्येक पिकाचे क्षेत्र समजणारआहे. ई-पीक पाहणी प्रकल्पाचा राज्यव्यापी प्रत्यक्ष वापराचा शुभारंभ कार्यक्रम फेसबुक, यूट्यूब आणि ट्विटर या समाजमाध्यमांवर लाईव्ह प्रसारीत करण्यात आला. या कार्यक्रमादरम्यान या प्रकल्पासाठी मेहनत घेणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषी मंत्री दादाजी भुसे, महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आला. महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी आभार मानले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

16 TO 22 AUGUST 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:23 PM Page 1



# सोलापूर शहरात दोन वर्षांत ६६ जण तडीपार

## सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली माहिती

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर शहरात दोन वर्षात शहरातील ६६ जणांना तडीपार करण्यात आली आहे. मोक्का, स्थानबद्ध तसेच तडीपाराची कारवाई यामुळे सोलापूर शहरात सामाजिक बांधिलकी, शांतता टिकून राहण्यास मोठी मदत झाली असल्याचे माहिती सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी दिली आहे. सोलापूर पोलीस आयुक्तालयाच्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यावेळी पोलीस उपायुक्त बापू बांगर, दीपाली धाटे उपस्थित होते.

यावेळी पोलीस आयुक्त शिंदे म्हणाले, दोन वर्षात दरोडा, जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यातील २ कोटी ३९ लाखांच्या ऐवजापैकी ४५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले. जुगार प्रकरणी २ हजार १४३ जणांना अटक केली. ५०७ गुन्हे उघडकीस आणून १ कोटी ९५ लाख ४२ हजार ५५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. परजिल्ह्यातील तसेच परराज्यातील ट्रक चालक तसेच त्यांच्या साथीदारांना मारहाण करून लुटालुटीचे प्रकार घडत होते. तसेच ट्रक चोरून नेण्याचे प्रकार घडले होते. या चोरी करणाऱ्या टोळीला जेरबंद करून ४८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. दरम्यान आयडीबीआय बँक फोडून फरार झालेल्याच्या मुसक्या आवळून ५५ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केले आहे. अलीकडेच मित्राचे अपहरण करून खंडणीची मागणी करणाऱ्यास कर्नाटकात जाऊन जेरबंद केले आहे व अपहरण झालेल्या व्यक्तीची सुखरूप सुटका देखील केली आहे. मात्र नवीपेठ मधील पाच दुकाने फोडून लाखो रुपयांच्या मोबाईल चोरी आणि गुटखा प्रकरणाचा तपास अद्याप सुरूच असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान कोरोना काळात कर्तव्य बजावणाऱ्या ९४.१६ टक्के पोलिसांनी पहिला डोस तर ७६.१२ टक्के पोलिसांनी दुसरा डोस घेतला आहे. एका डान्सबार वर कारवाई करताना संबंधीत पोलीस ठाण्याचे वाहन तेथे होते. त्याचा खुलासा करण्याबाबत त्या पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यास नोटीस बजावली असून त्यानंतर कारवाई करण्यात येईल असेही सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी सांगितले.

## भात, नाचणी पिके घेणारे जिल्ह्यातील शेतकरी होणार सहभागी

# भात पिकाच्या उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांमध्ये स्पर्धा

**पालघर/प्रतिनिधी**

शेतातील उत्पादन वाढीसाठी अनेक शेतकरी आपल्या शेतात विविध प्रयोग करत असतात. अशा उत्पादन वाढीच्या प्रयोगांना प्रोत्साहन देण्यासाठी आता राज्य शासनाच्या कृषी विभागाने पिक स्पर्धा आयोजित केली आहे. पालघर जिल्ह्यात पिक स्पर्धेमध्ये भात व नाचणी पिकांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेतून शेतकऱ्यांना रोख रकमांचे बक्षीसही कृषी विभागाकडून दिले जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादन वाढीचे विविध प्रयोग राबवून या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी राज्य शासन कृषी विभाग सातत्याने सहकार्य करत असतो. भात पिकाला आंतर पिकाची जोड देऊन शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी गेल्या काही वर्षापासून भाता सोबत तुरीचे उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे. या करीता भात शेती बांधावर तूर लागवडीसाठी जिल्ह्यातील



शेतकऱ्याना बियाणे देण्यात आले आहे. तसेच विविध पुरस्काराच्या माध्यमातून शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी सकारात्मक वातावरण तयार केले जाते. याचाच एक भाग म्हणून भात आणि नाचणी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी बळ मिळावे यासाठी पिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्य स्तरीय स्पर्धेचे संचालन प्रत्येक तालुक्यात केले जाणार आहे. पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यासाठी पिक स्पर्धा असून शेतकऱ्यांनी स्पर्धेत सहभागासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालया अंतर्गत येणाऱ्या कृषी सहाय्यक यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उत्पादन वाढीसाठी विविध प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना मंच मिळणार आहे. शेतकऱ्यांनी केलेले उत्पादन वाढीसाठीचे प्रयोग इतर सर्व शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्यास मदत होईल.

या स्पर्धेत भात व नाचणी या पिकाची लागवड केलेले शेतकरी सहभागी होऊ शकतात. सहभागी होण्यासाठी ७/१२ उतारा व ८अ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक, पिकाची किमान १० गुंठे पेक्षा जास्त क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. ३० ऑगस्ट पर्यत या स्पर्धेसाठी अर्ज करता येणार असून भात पिकाची पिक कापणी कृषी अधिकाऱ्यांसमोर करावी लागणार आहे. अधिक उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांचे राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढण्यात येतील. व क्रमांक मिळविणाऱ्या शेतकऱ्यांना रोख रुपयांचे बक्षीस आणि प्रमाणपत्राने गौरविले जाणार आहे. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि, अधिकारी पालघर यांनी केले आहे.

# अंबरनाथ मधील प्राचीन शिवमंदिर श्रावणातही बंदच



**अंबरनाथ/किरण तेलगोटे**

राज्यातील भगवान शंकराची सर्व मुख्य मंदिरं सामान्यांसाठी दर्शनासाठी बंद असल्याने सलग दुसऱ्या वर्षी शिवमंदिरांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अंबरनाथचं प्राचीन शिवमंदिरही यंदाच्या श्रावणात सलग दुसऱ्या वर्षी भक्तगणासाठी बंदच राहणार यामुळे भाविकांचा सलग दुसऱ्या वर्षी हिरमोड झाला आहे. श्रावण महिन्याला सुरुवात होत आहे. गेल्या अनेक वर्षापासून श्रावण सोमवारी राज्यातील शिव मंदिरांमध्ये नाविकांची मांदियाळी पाहायला मिळते. शिवभक्तांसाठी श्रावण सोमवार हा वर्षातील सर्वात महत्त्वाचा सण असतो, त्यामुळे सर्व सिवभक्त आपल्या आराध्याचे दर्शन घेण्यासाठी राज्यातील अनेक प्राचीन आणि ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतात. मात्र सध्या महाराष्ट्रात कोरोना संकटामुळे अद्याप प्रार्थनास्थळं बंद ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे यंदाही शिवभक्त त्यांच्या प्रिय आराध्य देवतेच्या दर्शनाला मुकणार आहे. राज्यातील भगवान शंकराची सर्व मुख्य मंदिरं सामान्यांसाठी दर्शनासाठी बंद असल्याने सलग दुसऱ्या वर्षी शिवमंदिरांमध्ये शुकशुकाट पाहायला मिळत आहे. अंबरनाथचं प्राचीन शिवमंदिरही यंदाच्या श्रावणात सलग दुसऱ्या वर्षी भाविकांसाठी बंदच राहणार यामुळे भाविकांचा सलग दुसऱ्या वर्षी हिरमोड झाला आहे, अशी माहिती प्राचीन शिव मंदिरचे पुजारी विजय चाहु पाटील यांनी दिली.

# कलवरी ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांनी टाकली धाड; २७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

विजयपूर रस्त्यावरील दक्षिण सोलापूर तालुक्यातील हतूर गावाजवळील कलवरी ऑर्केस्ट्रा बारवर विजापूर नाका पोलिसांनी धाड टाकून १० आरोपींना अटक केली असून २७ लाख ८९ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विजापूर नाका डी.बी. पथकाने कारवाई केली आहे. गुन्हे प्रकटीकरण पथकाला कलवरी ऑर्केस्ट्रा बारमध्ये काही व्यक्ती एकत्रित जमा होऊन दारू पित असून काही महिला संगीताच्या तालावर अश्लील चाळे नृत्य सादर करीत आहेत, अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यामुळे डी.बी.पथकाने तेथे धाड टाकला. त्याठिकाणावरून वैभव दत्तात्रय माळशिकारे (२१), वेटर अजय चंद्रकांत क्षिरसागर (३०), व्यापारी महेश राचप्पा अदानी (५५), मल्लिकार्जुन बसप्पा कुंभार (४८), प्रवीण बसवराज औरादी (४२), गुरुराज काडप्पा हलकरनी (२९), विलास विश्वनाथ हिरेमठ (५५), रोहित पांडुरंग चव्हाण (३५), नागेश तमणा जाधव (४५) व इंदोर येथील एका नर्तिकेला अटक करण्यात आली आहे. त्या ठिकाणी व्यवस्थापक, कामगार, नर्तिका व ग्राहक यांच्या ताब्यातून एकूण २७ लाख ८९ हजार १७० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. याबाबत विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपींना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता आरोपी वैभव माळशिकारे व अजय क्षिरसागर यांना एक दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली, तर उर्वरित आरोपींना वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी बारमालक राहुल तानाजी लकडे फरार असून त्याचा शोध चालू आहे. सदर गुन्ह्यांचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरज मुलाणी करीत आहेत. ही कारवाई सोलापूर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त डॉ.वैशाली कडूकर , सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.प्रिती टिपरे, विजापूर नाका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार कोल्हाळ तसेच पोलीस हवालदार राजकुमार तोळनुरे, प्रेमसिंह बायस, श्रीरंग खांडेकर, नरसिंग रुपनर, शिवानंद भीमदे, अयाज बागलकोटे, अनिल गवसाने आदींनी केली आहे.

# करंजपाडा येथील शिक्षकाचा आदर्श शिक्षकाचा सन्मान

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुका जागतिक आदिवासी दिन संयुक्त उत्सव कमिटी यांच्या वतीने हमरापूर (करंजपाडा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेवरील शिक्षक दीपक नवसु शनवारे यांचा गुरुवारी (दि.१२ ऑगस्ट) त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन आदर्श शिक्षक म्हणून सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी माजी वाडा पंचायत समितीचे सभापती योगेश गवा, माजी वाडा पंचायत समितीच्या सभापती मृणाली नडगे, विद्यमान पंचायत समिती सदस्य, राजेश सातवी, पुनम पथवा, अस्मिता लहांगे, वाडा नगरपंचायतीचे विद्यमान नगरसेवक अरुण खुलात, पालघर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव अनंता वनगा,



जागतिक आदिवासी दिन संयुक्त उत्सव कमिटी अध्यक्ष दिनेश पथवा, कार्याध्यक्ष नंदेश नडगे, सचिव पवन गवारी, वाडा तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश (बाळा) बाराठे, वाडा तालुका युवक काँग्रेस उपाध्यक्ष गणेश थाळेकर आदी उपस्थित होते.

# चांदी व्यापाऱ्याचा हिरोळी सीमेवर चक्कर येऊन मृत्यू

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील वागदरी सीमा व कर्नाटक सीमेवरील शेवटचे गाव हिरोळी, हिरोळी- वागदरी सीमेवरील श्री भाग्यवंती देवीच्या मंदिरासमोर वागदरी कडे जाणाऱ्या रोडवर एका ७१ वर्षीय चांदी व्यापाऱ्याचा पायी चालत जात असताना अचानक चक्कर येऊन पडून जागेवरच मृत्यू झाला आहे. शशिकांत गणपती एखंडे (७१) असे मृत झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. हा व्यक्ती कर्नाटक राज्यातील कलबुर्गी जिल्ह्यातील आळंद तालुक्यात चांदी विक्रीसाठी गेला होता. येताना सीमेपर्यंत तो कर्नाटक एस बस ने येऊन हिरोळी सीमेवर उतरून पायी चालत महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतील वागदरी गावाकडे निघाला होता. वागदरी येथे तपासणी नाक्यावर कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचारी एस.आर. राऊत व ए.बी.राठोड यांनी शशिकांत एखंडे याला अचानक चक्कर आल्यानंतर प्राथमिक उपचार व वैद्यकीय मदत मिळवून देतानाच त्यांच्याकडे असलेल्या ४ लाख ४६ हजार रुपयांची रोख रक्कम व एक लाखांची सुमारे ३ ते ४ किलो चांदीच्या वस्तू असा सुमारे साडे पाच लाख रुपयांचा ऐवज हस्तगत केला. याची आकस्मिक मृत्यू झाल्याचे अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाली असून ही माहिती शेतकरी शिवकुमार इरय्या मठपती (२८) यांनी दिली आहे. शशिकांत एखंडे यांना अचानक चक्कर येऊन पडल्यानंतर १०८ रुग्णवाहिका बोलावून घेतले त्यावरील डॉ.उमेश कराळे यांनी तपासून पाहिले असता मृत झाल्याचे सांगितले. या घटनास्थळाला अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पुजारी यांनी भेट दिली. मृतांचा जागेवरच पंचनामा करून रोख रक्कम व चांदी पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली आहे.

# सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.प्रीती टिपरे यांना केंद्रीय गृहमंत्रालयाचा उत्कृष्ट तपास अधिकारी पुरस्कार

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.प्रीती टिपरे यांना केंद्रीय गृहमंत्रालयाचा उत्कृष्ट तपास अधिकारी पुरस्कार जाहीर केला आहे. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने देशातील १५२ पोलिस अधिकाऱ्यांना उत्कृष्ट तपास अधिकारी म्हणून पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. त्या १५२ अधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा केंद्रीय गृहमंत्रालयाने केली. १५२ अधिकाऱ्यांमध्ये महाराष्ट्रातील ११ पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश असून त्यामध्ये सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.प्रीती टिपरे यांचा समावेश आहे. त्यांची उत्कृष्ट तपास अधिकारी या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. २०११ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून त्यांची पोलीस उपअधीक्षक म्हणून निवड झाली होती. प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर त्या सोलापूर ग्रामीण येथे रुजू झाल्या होत्या. सोलापूर ग्रामीण येथे काम करीत असताना अवैध धंदे बंद करण्यात यशस्वी पोलीस अधिकारी ठरल्या होत्या. त्यानंतर त्यांची उस्मानाबाद जिल्ह्यातील भूम येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांची पुणे शहर पोलीस दलात नियुक्ती झाली. २०१९मध्ये त्यांची परत सोलापूर पोलीस आयुक्तालयात बदली झाली आहे. डॉ प्रीती टिपरे शहरात कामकाज करीत असताना सुमारे १२ वर्षानंतर मोक्का कायद्यान्वये दाखल गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून तीन आरोपीविरुद्ध मोक्का न्यायालयात मुदतीत दोषारोपपत्र दाखल केले. तसेच सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीत गतिमंद मुलीवर झालेल्या अत्याचाराचा तपास करून आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०२० मध्ये अल्पवयीन दलित मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या गुन्ह्यांचा तपास डॉ प्रीती टिपरे यांनी करून गुन्ह्यातील सर्व ११ आरोपींना वेळेत अटक करून त्यांच्या विरुद्ध न्यायालयात दोषरोप पत्र सादर केले. सदर गुन्ह्यातील उत्कृष्ट तपास कामगिरीबद्दल त्यांना हे पदक जाहीर झाला आहे. डॉ. प्रीती टिपरे या सोलापूर पोलीस आयुक्तालयात मागील दोन वर्षापासून सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग २ पदावर कार्यरत आहेत. अनेक गुन्हे उकल करण्यात त्यांनी यशस्वी भूमिका बजावली आहे.

# भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुर्यकांतराव शेळके यांची निवड

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या लातूर जिल्हा उपाध्यक्षपदी सुर्यकांतराव शेळके यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी आजपर्यंत पक्षाच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी मार्गी लावण्याचे काम सक्षमपणे केलेले आहे. त्यांच्या कामाची दखल भारतीय जनता पार्टीने घेतली असून त्यांच्या हातून यापुढील कालावधीतही पक्षाचे कार्य जोमाने व्हावे. भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते वाढावे ही भूमिका लक्षात घेवून भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. या संबंधीचे नियुक्तीपत्र भारतीय जनता पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा आ.रमेशअप्पा कराड यांच्याहस्ते देण्यात आले. यावेळी बाबासाहेब कोरे, भारतीय जनता पार्टी लातूर जिल्हा उपाध्यक्ष निळकंठराव पवार, भारतीय जनता पार्टी लातूर तालुकाध्यक्ष महादेवराव गायकवाड आदींची उपस्थिती होती. त्यांच्या निवडीबद्दल भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, भाजपा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर यांच्यासह लातूर शहर व परिसरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यातून त्यांचे कौतुक होत आहे.


## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व, मुख्य कार्यालय-विरार**

**(दुरध्वनी क्रमांक ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३)**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | पावती क्रमांक | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुळींज-२ | NL02/954/6 | ५६७७ | प्रल्हाद सी. कोतवाल | नाजमा मोहम्मद झाकीर हुसैन शेख / |
| २. | तुळींज-२ | NL02/741/44 | ५६८० | सुनिल काशिनाथ तिवारी | रीना दिवाकर मौर्या / |
| ३ | तुळींज-२ | NL02/677/24 | ५६८२ | निलम जगदिश नोटियाल | लीला देवी नरेन्द्र सिंह रावत / |
| ४ | तुळींज-२ | NL02/747/29 | ५६८४ | जैनुल अबीदीन आविह हसन | रेणू जगदीश यादव / |
| ५ | तुळींज-२ | NL02/540/26 | ५६८६ | जनार्दन दादु पाटील | श्वेता संजय खेडेकर / |
| ६ | तुळींज-३ | NL03/607/48 | ५६८८ | कूश चिपळूणकर | पुष्पा धर्मेंद्र पासवान / |
| ७ | तुळींज-३ | NL03/940/26 | ५६९० | सदगुरू निवास | अजलीदेवी W/O संजय दास / |
| ८ | तुळींज-३ | NL03/607/47 | ५६९२ | लव चिपळूणकर | पुष्पा धर्मेंद्र पासवान / |
| ९ | तुळींज-५ | NL05/326/27 | ५६९४ | सहदेवी पी. खोत | मनोज कुमार शीतला प्रसाद पांडे / |
| १० | तुळींज-३ | NL03/495/40 | ५६९६ | दिपक विजय दळवी | प्रणाली प्रशांत तानवडे व शुभम प्रशांत तानवडे / |
| ११ | तुळींज-४ | NL04/324/16 | ५६९८ | शिला रमाकांत पवार | शुधीर शंकर जंगम व लीलाबाई शंकर जंगम / |
| १२ | तुळींज-६ | NL06/46/7 | ५७०० | सुनिल सदाशिव लेले | प्रज्ञा सुनिल लेले / |
| १३ | तुळींज-६ | NL06/101/139 | ५७०२ | गोविंद धोंडु चाळके | जितेंद्र विजय मोरे / |
| १४ | तुळींज-२ | NL02/623/14 | ५७०४ | सुशिल श्यामसुंदर मिश्रा | कौशल रमाशंकर तिवारी / |
| १५ | तुळींज-२ | NL02/552/11 | ५७०६ | अर्शद साबिलअली खान | झरीनाबानू अली अब्बास मन्सुरी / |
| १६ | तुळींज-७ | NL07/514/33 | ५७०८ | जयभवानी कंस्ट्रक्शन | दामोदर आनंद गोवेकर / |
| १७ | तुळींज-१ | NL01/59/5 | ५७१२ | अरविंद हरिश्चंद्र चौघुले | सचिन दत्ताराम कदम व तृप्ती सचिन कदम / |
| १८ | तुळींज-२ | NL02/350/5 | ५७१४ | आशा रमेश पाण्डे | इंद्रजीत अशोककुमार सोनी व पुनम इंद्रजीत सोनी / |
| १९ | तुळींज-७ | NL07/383/25 | ५७१७ | मोहन गुप्ता | बंदना निरज सिंह / |
| २० | तुळींज-३ | NL03/1019/12 | ५७१९ | छोटेलाल सहतीप्रसाद गौड | रेणुका चंद्रभुषण पांडे / |

जावक क्र. वविशम/कवि/७५/२०२१-२०२२
दिनांक : ०४/०८/२०२१

सही/-
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'ब' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

16 TO 22 AUGUST 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:24 PM Page 1



पान १ वरून....

## कुख्यात गँगस्टर पोलिसांच्या जाळ्यात...

दिल्ली, पंजाब, हरियाणा आणि राजस्थान या राज्यांत खंडणी, अपहरण, दरोडे आणि खून अशा गंभीर गुन्ह्यांच्या माध्यमातून आपल्या नावाची दहशत निर्माण करणाऱ्या काला जठेडी या गँगस्टरला दिल्ली पोलिसांनी गेल्या महिन्यात एक नामी शक्कल लढवून अटक केली. कोणीही कायदा हाती घेऊ नये असे सर्वसामान्य नागरिकांना वारंवार सांगणाऱ्या दिल्ली पोलिसांना मात्र, या नामचीन गुंडाला बेड्या ठोकण्यासाठी कायद्याच्या चौकटीबाहेरील कृत्य करावे लागले. पण त्यांनी ते केले नसते तर सात लाख रुपयांचे इनाम डोक्यावर असलेला हा बिष्णोई टोळीचा म्होरक्या पोलिसांच्या हाती कदाचित कधीच लागला नसता!... त्याचे झाले असे की, भारताचा जागतिक कीर्तीचा पहेलवान सुशीलकुमार याला मे महिन्यात सागर धनखड या अन्य एका पहेलवानाच्या हत्येप्रकरणी दिल्ली पोलिसांनी अटक केली. सुशीलकुमार याचे हरियाणा-दिल्ली पट्ट्यातील संघटीत गुन्हेगारी टोळ्यांशी चांगले संबंध होते. या गुंडांच्या मदतीने सुशीलकुमार याने सागर धनखड याचे त्याच्या खोलीतून अपहरण करून आणि त्याला जबरदस्त मारहाण करून त्याची हत्या केली होती. यावेळी सुशीलकुमार याने धनखड याच्या सोबत खोलीत असलेल्या सोनू महाल या त्याच्या मित्राचेही अपहरण केले होते. पण सोनूला फार मारहाण करण्यात आली नाही. सुशीलकुमार याने आपला सगळा राग धनखडवर काढला होता. ही मारहाण इतकी जबरदस्त होती की, व्यायामाचे कमवलेले पीळदार शरीर असलेला धनखड ही मारहाण सहन करू शकला नाही व त्याचा या मारहाणीमुळे मृत्यू झाला. सोनू महाल हा गँगस्टर काला जठेडी याचा भाचा. सुशीलकुमार याला हे नंतर समजल्यावर तो चपापला. सोनूला केलेल्या मारहाणीचा बदला काला जठेडी घेईल, अशी भीती त्याला वाटू लागली. सुशीलकुमार याने काला जठेडीपर्यंत संदेशही पाठवला की, माझी दुश्मनी ही सोनूशी नसून धनखडशी होती. सोनू त्याच्या सोबत असल्यामुळे त्याला मार पडला इतकेच!...पण काला जठेडी याने सुशीलकुमारला या कृत्याबद्दल माफ केले नव्हते. त्यामुळे तुरुंगात असूनही सुशीलकुमार बेचैन होता. तो आधी ज्या तुरुंगात होता, त्या तुरुंगात काला जठेडीच्या टोळीचे खूप सदस्य विविध गुन्ह्यांतर्गत बंद होते. या हस्तकांमार्फत काला जठेडी आपल्याला ठार मारेल, अशी भीती सुशीलकुमार याला वाटू लागली. त्यामुळे शेवटी न्यायालयाच्या परवानगीने त्याला तिहार जेलमध्ये हलवण्यात आले.

आता पोलिसांना काला जठेडी हवा झाला. कारण जर तो मोकळा राहिला तर सुशीलकुमार याच्या जीवाला धोका निर्माण करणार, हे निश्चित होते. पण काला जठेडी हा नक्की कोठे होता, हे समजत नव्हते. त्याचे हस्तक तो कधी दुबईत आहे असे सांगत तर कधी तो बँकाकमध्ये आहेत असे सांगत. काला जठेडीचे खंडणीसाठी धमकीचे जे काल विविध लोकांना आलेले होते, ते काल बँकाकहून आल्याचे लोकं सांगत होते. पण शेवटी काही खबरींच्या माध्यमातून पोलिसांना हे निश्चितपणे समजले की, काला जठेडी हा दुबई अथवा बँकाकमध्ये नसून भारतातच आहे!...तो आपले काल भारतात रिकार्ड करून बँकाकला पाठवत असे आणि तिथून ते रिलिज केले जात असत. त्यामुळे काला जठेडी हा बँकाकमध्ये आहे, असा आभास निर्माण होत असे. पण काला जठेडी जर भारतात आहे तर मग त्याला पकडणे हे पोलिसांसाठी आता अगत्याचे होऊन बसले...कारण तो सुशीलकुमारपर्यंत सहज पोहोचू शकण्याची मोठी भीती होती...आता काला जठेडीचे लोकेशन समजणे आवश्यक होते. पण दिल्ली, हरियाणा, पंजाब, यूपी या एवढ्या मोठ्या भूभागावर गुन्हेगारी साम्राज्य पसरवलेल्या काला जठेडीचे नेमके लोकेशन कसे शोधून काढायचे, ते समजत नव्हते. पोलीस डोकं लढवू लागले...आणि डोके लढवता लढवता त्यांना एक नामी शक्कल सूचली... दिल्ली पोलिसांनी धावपळ करत काला जठेडीचा एक प्रमुख हस्तक लारेन्स बिष्णोई याला एका गुन्ह्यांतर्गत अटक केली आणि सरळ तिहार जेलमध्ये त्याची रवानगी केली. पण अपेक्षेनुसार बिष्णोई हा तिहारमधून आपली गँग चालवू लागला. त्याला तिहार जेलमध्ये मोबाइल फोन सहज उपलब्ध झाला होता...पोलिसांनी त्याच्याकडील हा मोबाइल फोन शोधून काढला आणि जप्त केला. त्यानंतर बिष्णोईला कुठूनही मोबाईल फोन उपलब्ध होऊ नये याची पोलिसांनी दक्षता घेतली. जवळपास आठवडाभर मोबाइल हाताशी नसल्यामुळे बिष्णोई बेचैन झाला. त्याचा धंदा अडायला लागला. पोलिसांनी आता एक खेळी खेळली. या बिष्णोईच्या ओळखीतला एक इसम पोलिसांनी हाताशी धरला. हा पोलिसांचा खबरी होता. पण ही बाब बिष्णोईला माहित नव्हती. या खबरीच्या माध्यमातून पोलिसांनी एक मोबाईल बिष्णोईपर्यंत पोहोचवला. जेलमध्ये गुन्हेगारांना मोबाईलचा वापर करता येत नसतो. पण आपल्या देशातील तुरुंगात गुन्हेगारांना मोबाइल सहज उपलब्ध होत असतो, हे एक नग्न सत्य आहे. पोलिसांनी काला जठेडीपर्यंत पोहोचण्यासाठी बिष्णोईपर्यंत मुद्दाम मोबाईल फोन पोहोचू दिला...आपल्यापर्यंत फोन पोहोचल्यामुळे बिष्णोई खुश झाला तर आता बिष्णोई या फोनवरून काला जठेडीशी बोलेल आणि आपल्याला जठेडीचे लोकेशन समजेल, याची निश्चिती झाल्याने पोलीस खुश झाले... पोलिसांनी बिष्णोईचा मोबाईल टपिंगवर टाकला आणि तो कोणाकोणाशी काय काय बोलतो, हे ते गुपचूप ऐकू लागले. पहिले काही दिवस निराशा झाली. कारण बिष्णोईने जठेडीशी संपर्क साधला नव्हता...पण एके दिवशी बिष्णोईने काला जठेडीला फोन केला. पोलिसांनी तत्काळ त्या फोनचे लोकेशन तपासले. ते यूपीतले निघाले...पोलिसांनी ताबडतोब त्या ठिकाणी पथक पाठवले. पण सावध जठेडी तोवर तिथून फरार झाला होता...मात्र, यामुळे एक गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध झाली ती ही की, काला जठेडी हा दुबई अथवा बँकाकमध्ये नसून भारतातच आहे!... आता बिष्णोई जठेडीला पुन्हा केव्हा फोन करतो याची पोलीस वाट पाहू लागले. लवकरच बिष्णोईने जठेडीला दुसऱ्यांदा फोन केला. पोलिसांनी ते लोकेशन ट्रेस करून तिथेही पथक पाठवले. पण पुन्हा जठेडी पळून जाण्यात यशस्वी ठरला होता. हा प्रकार तीन-चारवेळा घडला. आता पोलिसांनी एक व्यूह रचला. आजवरच्या बिष्णोई-जठेडी संवादातून एक गोष्ट पोलिसांच्या लक्षात आली होती व ती म्हणजे जठेडी हा सध्या यूपीच्या मेरठ-सहारणपूर पट्ट्यात कोठेतरी आहे...पोलिसांनी हा पट्टा पिंजून काढायचे ठरवले. पोलिसांची तीस पथकं तयार करण्यात आली आणि या पट्ट्यातील विविध संदिग्ध ठिकाणी ती तैनात ठेवण्यात आली. आता पोलीस पुढच्या बिष्णोई-जठेडी संवादाची वाट पाहू लागले... लवकरच तो क्षण आला. बिष्णोईने जठेडीला पुन्हा काल केला. पोलिसांनी लोकेशन शोधलं. सहारणपूरमधील अमानत ढाबा. सुदैवाने या ढाब्यापासून पाच मिनिटांच्या अंतरावर एक पोलीस पथक तैनात होते. इशारा मिळताच हे पथक ढाब्यात शिरले. तिथे त्यांना जठेडी आढळला नाही. पण एक सरदारजी आपल्या मैत्रिणीसोबत मौजमजा करताना दिसले. वरिष्ठांना कळवण्यात आले. वरिष्ठ कडाडले, तो जो सरदारजी आहे, त्याला उचला...मैत्रिणीसकट ताब्यात घ्या. झाले! पोलीस पथकाने ताबडतोब अंमलबजावणी केली. सरदारजी ताब्यात आला. वरिष्ठ घटनास्थळी पोहोचले. सरदारजीची झडती घेण्यात आली. त्याची पगडी आणि नकली दाढी-मिशा उतरवण्यात आल्या...आणि काय आश्चर्य !...आता पोलिसांसमोर काला जठेडी हजर होता...तो सरदारजी म्हणजे काला जठेडीच होता. पकडले जाऊ नये यासाठी त्याने हे वेषांतर केलेले होते...आता पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि सर्व सोपस्कार आटोपून त्याची रवानगी थेट तिहार जेलमध्ये केली... ही संपूर्ण कारवाई दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या काउंटर इंटेलिजेंस विभागाचे पोलीस उपायुक्त मनीषी चंद्रा यांनी केली...अशा रितीने एका नामचीन गुंडाला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांनी स्वतःच एक अफलातून खेळी रचली. तिहार जेलमध्ये बंद गुंडापर्यंत स्वतःच मोबाईल पोहोचवला.

## कर्जबाजारी दारुड्याने घर विकायला ...

आहारी गेला होता. त्यामुळे तो कोणताही कामधंदा करीत नव्हता. दारू पिऊन येणे आणि आपल्या घरात झोपणे एवढाच त्याचा उदयोग बनला होता. त्याला भावाने किंवा आईने त्याला काही तरी काम कर म्हणून सांगितले की तो त्याचेवरच भडकत होता. दिवस रात्र दारू प्यायची आणि घरात येऊन कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण काढयाचे असे त्याचे नित्याचेच झाले होते. त्याच्या दररोजच्या भांडणाला त्याची आई शिवाक्का आणि भाऊ राजू हे वैतागलेले होते. अलिकडे तर राजू हा दारू पिऊन पिसाळल्यासारखे वागत होता. त्याला दारूच्या नशेत कशाचे भान राहत नव्हते. त्याने दारूच्या व्यसनासाठी अनेकांच्या कडून हात उसणे पैसे उचलेले होते. ती रक्कम ही फार मोठी होती. एक तर तो काही कामधंदा करीत नसल्याने उसणे घेतलेले पैसे तो परत देवू शकत नव्हता. त्यामुळे देणेकरी लोक त्याला पैशासाठी सारखा तगादा लावीत होते. एखाद्या देणेकऱ्याने बसवराजकडे पैशासाठी तगादा लावला की तो दारू पिऊन येऊन घरात दंगा करीत होता. भाऊ राजू आणि शिवाक्काबरोबर भांडण काढून त्यांना माझे देणे झाले आहे मला पैसे दया नाही तर राहते घर विकुया असे म्हणून त्याच्याबरोबर भांडण काढीत होता. बसवराज याने ही आपल्या देणेकऱ्यांना मी माझे राहते घर विकून तुमचे पैसे भागवतो असे सांगितले होते. त्यामुळे ते ही थोडे दिवस थांबले होते. त्याच्या देणेसाठी आपले वडिलार्जीत घर का विकायचे असे राजूचे म्हणणे होते. तर आई शिवाक्काही त्याला तू दारूसाठी देणे केले आहेस. त्या देण्याशी आमचा काहीच संबंध नाही असे सांगून ते दोघे ही बसवराज याला घर विकायला देत नव्हते. म्हणून तो त्याचेवर चिडत होता. मी तुमचा कोण नाही का? माझे देणे मला फेडायचे आहे. मग घर विकायालाच पाहिजे असे तो त्यांना सांगत होता. पण भाऊ आणि आई त्याला काही घर विकू देत नव्हते. यावर उपाय म्हणून बसवराज याने काही लोकांना आपले घर विकायचे आहे असे सांगून गिऱ्हाईक ही आणले होते. त्यांना त्याने हे घर माझ्या वाटणीचे आहे मला विकायचे आहे असे ही सांगितले. परंतू घर विकत घेणाऱ्याना त्या दोन घरात समाईक भिंत असल्याने आणि अजून कागदोपत्री बसवराज याची हिस्सेवारी झाली नसल्याने ते घर पंसत पडून ही व्यवहार होत नव्हता.ते बसवराज याला तुझ्या वाटणी ऐवजी सपूंर्ण घर जर विकत देत असाला तर विकत घ्यायला तयार असल्याचे सांगून व्यवहार मोडत होते.दोन्ही घरे विकायला त्याची आई आणि भाऊ तयार नव्हते तर अर्धे घर विकत घ्यायला गिऱ्हाईक तयार नव्हते त्यामुळे बसवराज याची गोची होत होती.एक तर देणे करी त्याच्या मागे पैशाचा तगादा लावत होते. तर दुसरीकडे घराचा व्यवहार आई आणि भावामुळे होत नव्हता. त्यामुळे तो दोन्ही बाजूनी कात्रीत सापडला होता. त्याला काय करावे आणि काय नको ते सुचत नव्हते.तो दारू पिऊन आला की घरात भावाबरोबर आईबरोबर भांडण काढून त्रास देत मारहाण ही करीत होता. त्याच्या या वागणुकीबद्दल त्याच्या शेजारच्या लोकांनी ही त्याला चार गोष्टी समजावून सांगितल्या होत्या. तू दारू पिण्याचे बंद कर. काही तरी कामधंदा कर. म्हणजे देणेकरी थांबतील तुझे देणे ही फिडत जाईल असे सांगून ही पाहिले होते. पण ऐकेल तो बसवराज कसला त्याला दारू पिण्याची इतकी सवय लागलेली होती की, एक दिवस जरी तो दारू पिला नाही तर त्याचे हात थरथर कापत होते. त्यामुळे त्याला दारू पिल्याशिवाय चैन पडत नव्हती.आता तर त्याची फार पुढे मजल गेली होती. आईची पेन्शन देखील तो तिला दमदाटी करून काढून घेत होता आणि ती रक्कम दारूत उडवत होता. त्याच्या या त्रासाला त्याची आई आणि भाऊ तर जाम वैतागलेले होते. तो सांगून ही सुधरत नव्हता त्याचे करायचे तर काय हा प्रश्न त्यांना पडला होता.त्याच्या दारूच्या व्यसनासाठी राहते घर तो विकायला सांगत होता. त्याचे आपण का ऐकयाचे असे त्याना वाटत होते. बुधवार दि.४ ऑगस्ट रोजी तो दिवसभर फुल्ल दारू प्यायलेला होता. रात्री घरी जेवायला आल्यावर त्याने भाऊ राजू आणि आई शिवाक्का यांना आपण घर विकुया माझे देणे भागवून राहिलेल्या पैशातून दुसरीकडे जागा घेऊन घर बांधुया असे सांगत होता. पण त्याची आई काही त्याचे ऐकत नव्हते. या कारणातून तो आई बरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत असताना मध्येच राजू हा तेथे आला. तो मध्ये आल्यावर बसवराज याचे आणखीनच टाळके सटकले. अगोदरच तो दारुच्या नशेत होता.त्याला नीट उभे राहता येत नव्हते. तोडाने नसुत्या शिव्या घालत होता. तुम्हा दोघांना मी आता बघूनच घेतो. राजू याला तर तुझ्यामुळे मला घर विकता येईना तु घर विकायला आईला का आडवतोस म्हणून त्याच्या ही अंगावर तो धावून गेला. तो दारूच्य नशेत असल्याने राजूने त्याला बाजूला ढकलून दिल्यावर तो कोपऱ्यात जावून पडला. त्याच्या हाताला कोपऱ्यात ठेवलेली कुऱ्हाड लागली. ती कुऱ्हाड घेऊन बसवराज राजूच्या अंगावर गेला. तसे त्याच्या आईने त्याला अडवून धरले. त्याच्या हातून कुऱ्हाड निसटली. तिच कुऱ्हाड राजू याने उचलून पाठमोऱ्या उभ्या असलेल्या बसवराजच्या डोक्यात जोरात हाणली.त्यासरशी बसवराज हा जोरात ओरडत जमीनीवर कोसळला.त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागला होता. तो जमीनीवर पडला तरी राजू हा काही शांत होत नव्हता.उलट त्याने त्याच कुऱ्हाडीने परत त्याच्यावर वार केले. साला मला मारायला येतो काय म्हणत त्याने वार केले होते.त्याच्या कुऱ्हाडीच्या एक दोन वारात बसवराज हा जागीच रक्ताच्या थारोळ्यात मृत्यूमुखी होऊन पडला.त्याचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच राजू भानावर आला. त्याने आपल्या हातातील कुऱ्हाड बाजूला फेकून देत बाजूला जावून डोळ्यात पाणी आणून उभा राहिला. घरातील आराडा ओरडयाने शेजारचे लोक ही त्याच्या घराकडे पळत आले. त्यावेळी रात्रीचे ११ वाजले असतील लक्ष्मीनगर येथे खूनाची घटना घडल्याचे मच्छे गावात समजताच लोकांची गर्दी वाढली होती. तळवार कुटुंबिय लक्ष्मीनगर येथे राहतात त्या भागात फारसी वर्दळ नसते. दिवसा ही हा परसिर तसा सुना सुनाच असतो.त्यातच खूनाची घटना घडल्याने एक नागरिकाने या संदर्भात ११२ क्रमांक डायल करून या घटनेची माहिती दिली. या ११२ क्रमाकांवरून वडगाव पोलीसाना या घटनेची माहिती समजातच घटनास्थळी वडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील कुमार नंदेश्वर हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी दाखल होऊन घटनेची माहिती घेतली. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याची माहिती पोलीसाना मिळाली होती. घटनास्थळी शेजारीच संशयीत आरोपी राजू तळवार हा उभा होता. पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी बेळगाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीसांनी संशयीत आरोपी राजू तळवार याला ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला आणले. त्याचे कडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता त्याने कोणतेही आढेवेढे न घेता आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. या घटनेची लेखी फिर्याद मयत बसवराज याची आई शिवाक्का तळवार (वय ६७) यांनी दिल्याने पोलीसांनी बसवराज शिवपुत्र तळवार (वय ४१) याच्या खून प्रकरणी त्याचा मोठा भाऊ राजू शिवपुत्र तळवार (वय ४५) याच्या विरोधात आयपीसी कलम ३०२,३४ नुसार गुन्हा नोंदवून त्याला मा.कोर्टासमोर पोलीसांनी उभे केले असता. मा.कोर्टाने त्याची रवानगी हिंडलगा जेलमध्ये केली होती. दरम्यान पोलीसांनी राजू तळवार याचेकडून गुन्हयात वापरलेली कुऱ्हाड जप्त केली.या घटनेचा पुढील तपास वडगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.सुनीलकुमार नंदेश्वर हे करीत आहेत. व्यसनाधीन माणूस हा आपल्या व्यसनपूर्तीसाठी कोणत्या ही थराला जातो आणि त्यातून तो कर्जबाजारी होतो.या जगात सुखाच्या सोबत सर्वजण असतात. पण संकटात किंवा दु:खात कोणीच कुणाचा नसतो. ज्याचे त्याने पाहयाचे असते. नाहीतर व्यसनाने घात हा ठरलेला असतोच हेच या घटनेवरून दिसून येते.

## पोपटाशी सोयरीक करून फसगत ...

खायला उठत होता. तिचे माहेर असलेल्या मंगरुळ या गावात पोपट संपत पवार हा तरुण रहात होता. माहेरी आली म्हणजे तिचा पोपट सोबत नजरेचा खेळ जुळून येत होता. त्यातूनच मंगरुळ येथील पोपट संपत पवार याच्याशी तिचे सुत जुळण्यास वेळ लागला नाही. हा चोरी चोरी चुपके चुपके प्रेमाचा खेळ पटकन कुणाच्या लक्षात आला नाही. सन २०१७ च्या दिवाळीत ती माहेरी मंगरुळ येथे आली. संगिता माहेरी आल्याचे बघून तिच्या आई वडीलांना हायसे वाटले. काही दिवस ती माहेरी राहिली. त्यानंतर सासरी जाते असे सांगून ती घराबाहेर पडली. सासरी जाण्याच्या नावाखाली घरातून बाहेर गेलेली संगिता थेट प्रियकर पोपट सोबत राहण्यास निघून गेली. कामधंद्यानिमीत्त पोपट दिंडोरी तालुक्यातील वनारवाडी येथे राहण्यास आला होता. संगिता देखील वनारवाडी येथे आपल्या मुलाला घेऊन पोपटसोबत भाड्याच्या खोलीत राहू लागली. संगीता आणि पोपट यांचे पुर्वीपासूनच प्रेमसंबंध सुरु होते. मात्र त्याचा कुणाला थांगपत्ता लागला नव्हता. घरातून सासरी जाण्यासाठी निघालेली संगिता अद्याप सासरी का पोहोचली नाही म्हणून तिच्या सासरसह माहेरची मंडळी चिंताग्रस्त झाली. सर्वजण तिच्या शोधात होते. मात्र ती कुणाला सापडली नाही. काही महिन्यांनी संगिताने तिच्या भावाला फोन करुन माहिती दिली की मी आता पोपटसोबतच वनारवाडी येथे रहात आहे. पोपटने जिवनभर साथ देण्याचे वचन दिले असल्याचे देखील तिने तिच्या भावाला कथन केले. मात्र गेल्या काही दिवसांपासून पोपट दररोज मद्यपान करुन घरी येतो आणि मला मारहाण करतो असे देखील तिने तिच्या भावाला फोनवर सांगितले. आपल्या बहिणीचा शोध लागल्याचे समजल्याने त्याला व तिच्या आईवडीलांना आनंद झाला. मात्र त्यासोबतच पोपट मद्यपान करतो आणि तिला मारहाण देखील करतो हे समजल्याने सर्वांना वाईट देखील वाटले. तिच्या पतीचे निधन झाल्यामुळे तिला देखील पुरुषाचा सहारा हवा होता. तो सहारा तिला पोपटच्या रुपाने मिळाला होता. सुरुवातीला पोपटने तिला सुखात ठेवले. मात्र काही दिवसांनी तो तिला मद्यपान केल्यानंतर रोजच त्रास देऊ लागला. संगिताचा भाऊ आणि नातेवाईक असे सर्वजण संगिताला भेटण्यासाठी वनारवाडी येथे आले. त्यांनी पोपटला समजावून सांगितले की झाले गेले विसरुन जा आणि पुढील वाटचाल दोघांनी मिळून व्यवस्थित करा. सर्वांसमोर पोपटने सकारात्मक भुमिका घेतली. मात्र काही दिवसांनी पोपट पुन्हा मद्यपान करु लागला. त्याच्या वागण्यात काही बदल झाला नाही. तो संगिताला मारहाण करु लागला. त्याच्या त्रासाला संगिता पार वैतागून गेली होती. त्याची शिवीगाळ व मारहाण तिला नकोशी झाली होती. रोजच्या त्रासाला वैतागून तिच्या मनात आत्महत्येचे विचार येवू लागले. मात्र आपण आत्महत्या केली तर आपल्या मुलाचे कसे होईल. त्यांचे पालनपोषण कोण करणार या विचाराने ती पुन्हा दुखी: राहू लागली. त्यामुळे मुलाला देखील ठार करुन आत्महत्या करण्याचे विचार तिच्या मनात घोळू लागले. शेवटी मुलासोबतच आपण देखील या जगाचा निरोप घेण्याचा तिने मनाशी निश्चय केला. ४ ऑगस्टला ती आणि तिचा मुलगा असे दोघे घरात होते. घरात केवळ दोघेच जण असल्याचे बघून तिने दरवाजा आतून बंद केला. मनावर दगड ठेवत जिवापाड प्रेम करणाऱ्या सात वर्षाच्या मुलाला तिने गळफास देत त्याची जिवनयात्रा संपवली. त्यांनतर तिने गळफास घेतलेल्या अवस्थेतच त्याला घराच्या छताला बांधले. मुलाला ठार केल्यानंतर तिने देखील क्षणाचाही विलंब न करता छताला दोरीच्या मदतीने गळफास घेत आपली जिवनयात्रा संपवली. अशा प्रकारे अगोदर तिने मुलाला ठार केले. त्यानंतर स्वत:ही आत्महत्या करत आपले जिवन संपुष्टात आणले. अशा प्रकारे पोपटच्या रोजच्या त्रासाला वैतागून तिने आपली कायमची सुटका करुन घेतली. आपल्या पश्चात आपल्या मुलाची काळजी नको म्हणून त्याला देखील तिने ठार केले. या घटनेची माहिती दिंडोरी पोलीस स्टेशनला समजताच पोलिस पथकाने घटनास्थळ गाठले. दत्तू नामदेव भेरे यांनी दिलेल्या खबरीनुसार सुरुवातीला याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली. सदर अकस्मात मृत्यूची नोंद ५७/२१ या क्रमांकाने घेण्यात आली. संगीता बाबुराव गोधडे उर्फ संगीता प्रकाश पवार व तिचा मुलगा कार्तिक प्रकाश पवार यांच्या मृत्यूप्रकरणी संगिताचा भाऊ रविंद्र बाबुराव गोधडे याने फिर्याद दाखल केली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोपट संपत पवार याच्याविरुद्ध दिंडोरी पोलीस स्टेशनला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गु.र.न. ४८८/२१ भा.द.वि. ३०६ नुसार दाखल करण्यात आला. दरम्यान हवालदार शंकर खंडेराव जाधव यांच्या फिर्यादीनुसार संगीता प्रकाश पवार हिच्याविरोधात मुलगा कार्तिक(७) याची गळफास देत हत्या व स्वत: आत्महत्या केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गु.र.न. ४८९/२१ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी पोपट संपत पवार यास अटक केली. अटकेनंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला त्याला पोलिस कोठडी सुनावली. आरोपी पोपट पवार सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. पोलीस अधीक्षक सचिन पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, उपअधीक्षक अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडोरी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत तारगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी या गुन्ह्याचा तपास पुर्ण केला.

## लाच प्रकरणातून हत्येचा उलगडा...

अनैतिक संबंधातून आपल्या मित्राची हत्या केली करून अपघात झाल्याचा बनाव रचला होता. याप्रकरणी सुलू पोलिसांनी मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत. गेल्यावर्षी आरोपी राहुल कासट यानं अनैतिक संबंधातून आपला मित्र सुरेश करवा याचा खून केला होता. यानंतर आरोपीनं सुरेशचा अपघातात मृत्यू झाल्याचा बनाव रचला होता. दरम्यान या प्रकरणाशी संबंधित एक ऑडीओ क्लिप समोर आली होती. या व्हिडीओ समोर आल्यानंतर, संबंधित अपघाताचा तपास करणारे उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र पाल आणि पोलीस कर्मचारी गणेश चव्हाण यांनी कारवाई टाळण्यासाठी राहुल कासटकडे २ कोटी रुपयांची लाच मागितली. पण आरोपी कासटनं याप्रकरणाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिली होती. या प्रकरणी लाचलुचपत विभागानं कारवाई करत दोन्ही पोलिसांना रंगेहाथ अटक केली होती. या प्रकरणी पोलिसांनी अधिक तपास केला असता, २ कोटींच्या लास प्रकरणातील फिर्यादी राहुल कासट हा आपला मित्र सुरेश करवा यांच्या अपघात प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याचं समोर आलं आहे. मयतचा भाऊ सतीश करवा यांनी हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त केला होता. याप्रकरणात पोलिसांनी १ ऑगस्ट रोजी जितेंद्र भरतसिंग ठाकूर याला अटक केली होती. राहुल कासटनंच सुरेशची हत्या करून तो अपघात असल्याचा बनाव रचल्याची कबुली सह आरोपी ठाकूरनं दिली आहे. आरोपी कासटनं त्याच्याकडे काम करणारा हमाल विनोद अंभोरे आणि विशाल पाटोळे यांना सुरेशच्या हत्येची सुपारी दिली होती. कासटच्या सांगण्यावरून अंभोरे यानं शहरातील एक चारचाकी वाहन भाड्यानं घेत, वाहनचालक राजेभाऊ खंडागळे यालाही कटात सामील करून घेतलं. यानंतर वाहनचालक आरोपी खंडागळे यानं सुरेश यांच्या दुचाकीला अपघात घडवून त्यांची हत्या केली आणि घटनास्थळावरून फरार झाला. यानंतर आरोपी विनोद अंभोरे आणि विशाल पाटोळे त्याठिकाणी आले त्यांनी करवा यांच्या पाठीत दगड घालून त्यांची हत्या केली. याप्रकरणी पोलिसांनी ४ ऑगस्ट रोजी तीन मारेकऱ्यांना अटक केली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

पान ८ वरून....

## देशमुख कुटुंबियाच्या वतीने...

व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, बसवराज पाटील नागराळकर, मनपा विरोधी पक्षनेते दीपक सूळ, रमेश बियाणी, व्हाईस चेअरमन पृथ्वीराज शिरसाट, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. लक्ष्मण देशमुख, डॉ. आरदवाड, लातूरचे निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, उस्मानाबादचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुबाकले, लातूरचे उपविभागीय अधिकारी सुनील यादव, तहसीलदार स्वप्निल पवार, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, सचिन मस्के, दगडूसाहेब पडीले, महादेव मुळे, संतोष देशमुख, संभाजी रेड्डी, सुभाष जाधव, डॉ.उदय मोहिते, डॉ.विनोद खेडकर, प्रवीण पाटील, अविनाश देशमुख, प्रमोद जाधव, रमेश राठी, व्हा. चेअरमन श्याम भोसले, सचिन दाताळ, मोहन सुरवसे, सिकंदर पटेल, फारुक शेख, हरिभाऊ गायकवाड, दिनेश गोजमगुंडे, विष्णुदास धायगुडे, मदन धुमाळ, गंगाधर आरडले, बालाप्रसाद बीदादा, सुंदर पाटील कव्हेकर, महेश काळे, रमेश सूर्यवंशी, सुभाष घोडके, एम.पी. देशमुख, पत्रकार विनोद कांबळे, संभाजी सूळ, ईश्वरप्रसाद चांडक, पी.के.पाटील, संभाजी सुळ, राजेश्वर निटूरे, बबन भोसले, श्याम देशमुख आदीसह काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वांनी कोवीड१९ नियमाचे पालन करून गर्दी टाळून महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रियमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या ९व्या स्मृतिदिनानिमीत्त आदरांजली अर्पन केली

## कास्ट्राईब शिक्षक संघटनेची...

एन पी एस रक्कम शिक्षकांच्या खात्यात जमा करावी या बाबतही विचारविनिमय झाला. अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष नवनाथ जाधव यांनी सांगितले. या वेळी जागतीक आदिवासी दिनानिमित्त नवनियुक्त जिल्हा परिषद अध्यक्ष वैदेही वाढाण व उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सांबरे यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. शिष्टमंडळात पालघर जिल्हा कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे अध्यक्ष नवनाथ जाधव, केंद्र प्रमुख संघटनेचे अध्यक्ष रमेश चव्हाण, घनश्याम कांबळे, संतोष गाढे, राज्य उपाध्यक्ष विजय कुमार जाधव हे सहभागी होते.

## उल्हासनगरातील ओमी कलानी टीमच्या दोन पदाधिकाऱ्यांवर पॉक्सो अंतर्गत गुन्हा

उल्हासनगर/किरण तेलगोटे

ओमी कलानी टीमचे युवक कार्याध्यक्ष पंकज त्रिलोकानी यांच्यासह अधोगपती रोशन माखीजा यांच्यावर उल्हासनगर पोलीस ठाण्यात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला. राजकीय वादातून पंकज त्रिलोकानी यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याची प्रतिक्रिया ओमी टीमचे प्रवक्ता कमलेश निकम यांनी दिली. उल्हासनगर ओमी कलानी टीमचे युवक अध्यक्ष पंकज त्रिलोकानी व उधोगपती रोशन माखीजा आदी दोघे जण पक्षाच्या एका कार्यकर्त्याच्या घरी १४ मे २०२१ रोजी जेवण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी घरी कार्यकर्ता व त्याची अल्पवयीन मुलगी घरी होती.जेवण बाहेरून आणण्यासाठी कार्यकर्त्याला घरा बाहेर पाठवून दोघांनी मुलीवर अत्याचार केला. झालेला प्रकार मुलीने वडिलांना सांगितला. मात्र भीतीपोटी तक्रार दाखल केली नव्हती.अखेर मुलगी व मुलीच्या वडिलांनी उल्हासनगर पोलीस ठाणे गाठून पंकज त्रिलोकानी व रोशन माखीजा यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.पोलिसांनी दोघांवर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केल्याने एकच खळबळ उडाली. पंकज त्रिलोकानी यांच्यासह इतरांवर काही महिन्यांपूर्वी खंडणीचा गुन्हा दाखल झाला होता. यातून बाहेर येत नाही तोच पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने ओमी टीममध्ये खळबळ उडाली आहे. मात्र ओमी कलानी टीमचे प्रवक्ता कमलेश निकम यांनी राजकीय वैमनस्यातून गुन्हे दाखल झाल्याचा आरोप केला आहे.

16 TO 22 AUGUST 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:24 PM Page 1



# भिवंडीत दरोडा टाकण्यासाठी आलेल्या आरोपींकडून गांजा, दागिन्यांसह रिव्हॉल्व्हर दोन जिवंत काडतुसे जप्त



**भिवंडी/आकाश गायकवाड**

शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी कृत्य होत असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या नेतृत्वाखाली एकूण तीन गुन्ह्यांची उकल करीत दहा किलो गांजा, एक रिव्हॉल्व्हर दोन जिवंत काडतुसांसह चोरीस गेलेला ८० ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात यश मिळविले आहे. पोउप निरीक्षक रवींद्र पाटील यांना गुप्त बातमीदारा मार्फत आमपाडा शानदार मार्केट येथे सोहेल शेख नामक व्यक्ती आपल्या साथीदारासह गांजा विक्री करण्यासाठी येत असल्याची माहिती मिळताच वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शानदार मार्केट येथे सापळा रचून दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्या मोटारसायकल वरील थैलीत दोन पॅकेटमध्ये २ लाख ७ हजार ८०० रुपये किमतीचा १० किलो ३९० ग्रॅम गांजा व दुचाकी मोबाईल असा एकूण २ लाख ५७ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. टेमघर येथील गोरखनाथ अंकुश म्हात्रे यांनी सार्वजनिक रस्त्यालगत आपल्या जवळील ९० ग्रॅम वजनाचे दागिने आपल्या दुचाकीच्या डिक्कीत ठेवून दुचाकी उभी करून ठेवली असता आरोपी अनिल पाल याने सदर दुचाकी चोरी केली होती.

या बाबत २ लाख १५ हजार रुपयाच्या चोरी बाबत गुन्हा दाखल असताना पोलिसांनी तांत्रिक तपासा द्वारे माहिती मिळवून रांची रा.झारखंड येथून आरोपीस ताब्यात घेऊन ८० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. तर शांतीनगर भाजीमार्केट येथील मन्नत गोल्ड या सोने विक्री च्या दुकानात रात्री साडेनऊ वाजताच्या चांदीची अंगठी खरेदी करण्याचा बहाण्याने आलेल्या ग्राहकाने दुकानदार अंगठी दाखवीत असताना आपल्या जवळील रिव्हॉल्व्हर दुकानदाराच्या गळ्याला लावून त्या कडील सर्व दागिने चोरीचा प्रयत्न केला असता या गुन्ह्याची माहिती प्राप्त होताच गांभीर्य लक्षात घेऊन पोशिपाई श्रीकांत पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आरोपीस निशस्त्र करून आरोपीस ताब्यात घेत त्याच्या जवळून एक रिव्हॉल्व्हर दोन जिवंत काडतुसं जप्त करण्यात यश मिळविले आहे. पोलीस उपयुक्त योगेश चव्हाण सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत, पोनिरीक्षक किरणकुमार काबाडी, नितीन पाटील, विक्रम मोहिते यांच्या नेतृत्वखाली पोउपनिरी रवींद्र पाटील, निलेश जाधव, बडगिरे, पोलीस पथकातील शेळके, चौधरी, वडे, इथापे, सैय्यद, वेताळ, काकड, मोहिते, जाधव, श्रीकांत पाटील, इंगळे, पाटील, सानप या पथकाने ही कारवाई केली आहे.

# भिवंडीत वडिलांना शिवीगाळ केल्याच्या रागातून व्यापाऱ्यास केली बेदम मारहाण

**भिवंडी/अभिजित हिरे**



शहराच्या नजीक काटई ग्रामपंचायत हद्दीत प्लास्टिक मणी बनविणाऱ्या कारखानदारास तीन जणांच्या टोळक्याने वडिलांना शिवीगाळ केल्याच्या रागातून लोखंडी रॉड, दगड, लाकडी दंडक्याने बेदम मारहाण केली यामध्ये व्यापाऱ्याच्या पायास फॅक्चर झाले असून ही संपूर्ण घटना परिसरात लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाली आहे. अमीर खान असे बेदम मारहाण झालेल्या प्लास्टिक मणी कारखानदाराचे नाव रात्री ते आपल्या कारखान्यातून घरी जाण्यासाठी निघाले असता सायंकाळी ८.४५वा च्या सुमारास त्या ठिकाणी अमोल गुरुनाथ पाटील, मेहबूब जब्बार पटेल, शादाब अहमद आफताब अन्सारी हे त्या ठिकाणी येऊन अमोल चे वडील गुरुनाथ पाटील यांना कारखानदार अमीर खान याने शिवीगाळ केल्याचा जाब विचारीत त्यास या तिघा जणांनी लोखंडी रॉड, दगड, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. परिसरातील नागरीक अमीर खान यास वाचविण्यासाठी पुढे आले असता त्यांना ही या टोळक्याने धमकावीत मारहाण केली. या मानहाणी नंतर टोळके त्या ठिकाणाहून पसार झाले तर जखमी अमीर खान यांना खाजगी रुग्णालयात उपचारा साठी दाखल करण्यात आले असून त्यांच्या पायास फॅक्चर झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी निजमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अमोल गुरुनाथ पाटील, मेहबूब जब्बार पटेल, शादाब अहमद आफताब अन्सारी यांना अटक केली आहे. दरम्यान या संपूर्ण मारहाणीची घटना परिसरात लावलेल्या सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### आकाशवाणी वृत्तविभागातर्फे प्रश्न मंजुषा स्पर्धा

मुंबई: भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्न अमृत महोत्सवानिमित्ताने आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाने मंजुषा स्पर्धा आयोजित केली आहे. स्वातंत्र्यसंग्रामातील महत्त्वाच्या बाबीविषयी समाजात औत्स्युक्य निर्माण व्हावे, ऐतिहासिक स्मृतींना उजाळा मिळावा आणि समाजमनात त्याचे स्थान कायम रहावे, या उद्देशाने ज्ञान, प्रबोधनासाठी ही स्पर्धा १६ ऑगस्टपासून आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी आकाशवाणीच्या बातमीपत्रातून दर सोमवारी एक प्रश्न विचारला जाईल. स्पर्धकांनी या प्रश्नाचे उत्तर आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्तविभागाकडे ई-मेलद्वारा पाठवायचे आहे. quiz75newsgmail.com या ई-मेलवर स्पर्धकांनी उत्तर पाठवावे सर्वप्रथम योग्य उत्तर देणाऱ्या यशस्वी स्पर्धकाचे नाव शुक्रवारच्या बातमीपत्रातून प्रसारित करण्यात येतील. आकाशवाणीच्या सोशल मिडियाच्या प्लॅटफॉर्मदरही फोटोसह हे प्रकाशित करण्यात येईल. तसेच प्रशस्ती पत्रक देऊन सन्मान करण्यात येईल. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याच आवाहन आकाशवाणी मुंबईच्या वृत्तविभागप्रमुख सरस्वती कुवळेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### 'सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्कार'साठी नामांकन

मुंबई : देशाची एकता व अखंडता राखण्यासाठी निस्वार्थ भावनेने अथक कार्यासाठी देण्यात येणाऱ्या सरदार पटेल राष्ट्रीय एकता पुरस्कार'साठी दि. १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन नामांकने दाखल करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. देशाची एकता व अखंडता राखण्यासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्थेस त्यांनी केलेल्या कार्याच्या गौरवार्थ हा पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या दिवशी म्हणजेच ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी कोणताही भारतीय नागरिक वा भारतामधील संस्था/संघटना ऑनलाईन नामांकन करु शकतात. पुरस्कारासाठी विशेष तयार करण्यात आलेल्या www.nationalunityawards.mha.gov.in या पोर्टलवरच आपली नामांकने दाखल करायची आहेत. या पोर्टलवर दिलेल्या विहित नमुन्यात, राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने केलेल्या विशेष कार्याची तसेच आवश्यक इतर सर्व माहितीसह नामांकन सादर करणे आवश्यक आहे. नामांकन पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ ऑगस्ट, २०२१ असा आहे, असे समान्य प्रशासन विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

### शालेय राष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडुंनी अर्ज करावे

पालघर : केंद्र शासनाच्या आयकर विभागाद्वारा, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभागी तसेच प्राविण्यधारक खेळांडुकरिता विविध पदांच्या खेळाडू भरतीचा कार्यक्रम प्रसिध्द झाला असून, या करिता भारतीय शालेय खेळ महासंघाने आयोजित केलेल्या, शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत, महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले खेळाडुं पात्र ठरणार आहेत. सदर भरतीकरिता पात्र खेळाडुंना, शालेय राष्ट्रीय स्पर्धेमधील कामगिरी संचालनालयाद्वारा प्रमाणित करुन देण्यात येणार आहे. राज्यातील कोव्हिड-१९ विषाणुच्या प्रादुर्भावाचा विचार करता, खेळाडुंनी पुणे येथे व्यक्तीश: उपस्थित राहणे धोक्याचे ठरु शकते. यास्तव राज्यातील शालेय राष्ट्रीय स्पर्धेतील सहभागी खेळाडुंनी विहित नमुन्यातील फॉर्म-४ प्रमाणित करुन घेण्यासाठीचे अर्ज दि. २० ऑगस्ट २०२१ पुर्वी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पालघर येथे सादर करावेत. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी. असे आवाहन शरद कलावंत, जिल्हा क्रीडा अधिकारी, पालघर यांनी केले आहे.

# मंगळवेढा येथे शेततळयातील पाण्याचा अंदाज न आल्याने दोघा मित्रांचा पाण्यात बुडून मृत्यू





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात, मंगळवेढा-पंढरपूर महामार्गालगत असलेल्या शेततळयात पोहावयास गेलेल्या शहदाब अमजद रजबअली (वय १० वर्षे रा शनिवार पेठ, मंगळवेढा जि सोलापूर), प्रज्वल हेमंत लोहार (वय ११ वर्षे रा किल्ला भाग, मंगळवेढा जि सोलापूर) या दोन मित्रांना पाण्याचा अंदाज न आल्याने तसेच नीट पोहता येत नसल्याने दोघेजण पाण्यात बुडून मयत झाले असून या घटनेची मंगळवेढा पोलीस ठाण्यात अनैसर्गिक मृत्यू अशी नोंद झाली आहे. दरम्यान, या दोन बालकांच्या मृत्यूमुळे मंगळवेढा शहर व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेची हकिकत अशी, यातील मयत प्रज्वल लोहार व शहदाब रजबअली हे दोघे नगरपालिकेच्या इयत्ता चौथी वर्गात शिकत होते. ते दोघे जीवलग मित्र असल्याने व अन्य मित्र वैभव विजय देसाई व शुभम लोहार असे चौघेजण दि.१२ ऑगस्ट रोजी सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास मंगळवेढा पंढरपूर रोडलगत खवतोडे यांच्या शेतात असलेल्या शेततळयात पोहण्यास गेले होते. शेततळयातील पाणी खोल असल्याने या पाण्याचा अंदाज न आल्याने त्या दोघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या मृत्यूची घटना वाऱ्यासारखी संपूर्ण तालुकाभर पसरल्यानंतर पालक वर्गातून हळहळ व्यक्त होत होती. मयत शहदाब हा आई वडीलास एकूलता एक मुलगा होता. याच्या मृत्यूने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेची खबर हेमंत लोहार व असिफ दरवाजकर यांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात दिली असून याची अनैसर्गिक मृत्यू अशी नोंद झाली आहे. मंगळवेढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्योतिराम गुंजवटे यांना माहिती मिळताच घटनास्थळी आपली पोलीस टीम ताबडतोब मदतीसाठी पाठविले, अधिक तपास पोलीस हवालदार तुकाराम कोळी व पोलीस नाईक तळवार हे करीत आहेत.

# कासा हायवेवर ११ लाख ४१ हजारांचा पान मसाला जप्त



**कासा/प्रतिनिधी**

मुंबई-गुजरात महामार्गावर कासा पोलिसांनी गुजरात वरून मुंबईकडे जाणारा एक टेंपो पकडला असून त्यातून ११,४१,२०० रुपयांचा पान मसाला आणि सुगंधी सुपारी जप्त केली आहे. महामार्गावर कासा गावच्या हद्दीत वाहनांची तपासणी करीत असताना एम.एच.०४ एच.वाय.६३८१ क्रमांकाच्या टेंपोची तपासणी केली असता हा माल सापडला. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. या आरोपींकडून २,८८००० रुपये किंमतीच्या पुकार पान मसाला या सुगंधी सुपारीच्या ८ गोणी प्रत्येक गोणीत ३०० पॅकेट ७२ हजार रुपये किमतीचे पुकार चॉईंग टॉबेकोचे २४०० पाऊच, ३१९२०० रुपये किंतीच्या बनारसी आशिक या सुगंधी सुपारीच्या ३८ गोणी प्रत्येक गोणीत पॅकेट, १५९६०० रुपये किंतीचे चोईग तंबाखूचे ऐकून ७९८० पॅकेट, ३२४०० रुपये किंतीच्या केषर युक्त अंकल गोल्ड या सुगंधी सुपारीच्या ३८ गोणी प्रत्येक गोणीत ३०० पॅकेट असे ऐकून ५४०० पॅकेट आणि १० लाख रुपये किंमतीचा अशोक लेलंड कंपनीचा टेंपो असं २१४२२०० रुपयांचा ऐवज जप्त केला. या प्रकरणी कासा पोलीस ठाण्यात गु.र.कर. १२३/२०२१ भा.द.वी.कलम ३२८,१८८,२७२,२७३,३४सह अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसूचना कलम २६२,२७,२३,२६२४,३०२ अन्वये दोन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई स.पो.नि.सुनील गोसावी प्रभारी अधिकारी कासा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाण्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी केली.

# जैन इरिगेशनच्या एकत्रित उत्पन्नात ३२.८ टक्के वाढ

**जळगाव/प्रतिनिधी**



या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जैन इरिगेशनच्या एकत्रित उत्पन्नात ३२.८ टक्के वाढ नोंदवण्यात आली. भारतातील ठिबक व तुषार सिंचनाचे संच उत्पादन करणाऱ्या प्रथम क्रमांकाची तसेच जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीने १० ऑगस्ट रोजी घेतलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत चालू आर्थिक वर्षाच्या म्हणजे २०२१-२२च्या पहिल्या तिमाहीच्या आर्थिक निकालास मंजूरी दिली व ते जाहीर करण्यात आले. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की, जागतीक पातळीवर कंपनीकडे ३८०४ कोटी रुपयांच्या ऑर्डर्स हातात आहेत. आर्थिक वर्ष २०२१-२२च्या पहिल्या तिमाहीचे ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. एकत्रित करश्चात नफा १३.४ कोटी रुपये. एकत्रित कर, व्याज व घसाराकरपूर्व नफा २६३.८ कोटी रूपये आणि एकल कर, व्याज व घसारा करपूर्व नफा १०२.२ कोटी रुपये. एकत्रित कर, व्याज व घसारा करपूर्व नफ्याच्या मार्जिन ६ टक्कयांनी वाढून १४.८ टक्के झाले आणि एकल कर, व्याज व घसाराकरपूर्व नफ्याच्या मार्जिन१.८ टक्क्यांनी वाढून १४.७ टक्क्यांवर पोहोचला. ग्राहकांकडून कंपनीकडे जागतिक पातळीवर ३८०४ कोटी रुपयांच्या ऑर्डर्स बुक. आर्थिक वर्ष २०२१-२२च्या पहिल्या तिमाहीचे लेखापरीक्षणापूर्वीचे आर्थिक निकाल जाहीर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. एकल उत्पन्नात ४५.३ टक्के अशी चांगली वाढ झाली व एकत्रित उत्पन्नात ३२.८ टक्के वाढ झाली. आपण तुलना केल्यास हे आकडे मागील तिमाहीसारखेच आहेत (आर्थिक वर्षातील चौथी तिमाही हा काळ सूक्ष्मसिंचनाच्या व्यवसायाचा मोठा हंगाम असतो.) कंपनीच्या एकूण कामकाजात भारतात आणि जगात आर्थिक वर्षाच्या सुरूवातीलाच चांगली वाढ झाली. पुरवठा साखळीत आणि निर्यातीत अनेकदा व्यत्यय आलेल्या या पहिल्या तिमाहीत कोविड-१९च्या महामारी व आव्हानात्मक परिस्थितीत रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली होती. अशी बिकट परिस्थिती असूनही, कंपनीच्या ऑपरेटींग मार्जिनमध्ये लक्षणीय सुधारणा झाली. एकल कामकाजात खेळत्या भांडवलाची कार्यक्षमता ३१ टक्कयांनी वाढली (१८८ दिवस). व्यवस्थापनाच्या सततच्या लक्ष केंदित केल्याने ऑपरेटिंग रेशोत वाढ झाली आणि खर्चात कपात झाली. जागतिक पातळीवर कंपनीला मिळालेल्या ३८०४ कोटींच्या ऑर्डर्समुळे पुढील तिमाहीत उत्पन्नात आणखी वाढ नोंदविता येईल अशी आशा आहे, असे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी सांगितले.

# दोन सराईत आरोपींना केले पोलिसांनी केले जेरबंद; सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहरातील रेल्वे स्टेशन जवळ झालेली घरफोडी उघडकीस आले असून दोन सराईत आरोपींना जेरबंद करण्यात सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला यश आली आहे. त्यांच्या कडून सोन्याचे दागिने, चांदीचे शिक्के व वस्तू असा सुमारे सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दीपक महादेव थोरात (३५) व दादासाहेब ऊर्फ दत्ता नाथा कांबळे (२८) अशी अटक केलेल्या दोन संशयित आरोपीचे नांवे आहेत. २८ ते ३० जून दरम्यान गोविंद रघुनाथ सबनीस यांच्या बंद घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने, चांदीचे शिक्के, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण १ लाख १८ हजार ६०० रुपयांचा ऐवज चोरीस गेला होता. त्यांच्या फिर्यादीवरून पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कराड शहरातील एसटी स्टँड समोरून दोन सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले. त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच त्यांनी मागील काही महिन्यांपूर्वी पंढरपूर शहरात घरफोडी केल्याचे सांगत असून त्यांनी चांदीचा ताट व समई चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले सोन्याचे नेकलेस, सोन्याचे टॉप्स, इतर सोन्याचे दागिने व चांदीचे शिक्के, समई, चांदीचा ताट असा एकूण सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पकडलेल्या इसमापैकी एक इसम हा सांगली व सातारा जिल्ह्यातील रेकॉर्डवरचा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुद्ध इस्लामपूर, सांगली, कराड येथे गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपींना पंढरपूर शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले असून त्यांच्याकडून अधिक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदरची ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक फौजदार ख्वाजा मुजावर, पोलीस हवालदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, समीर शेख यांनी केली आहे.

# भिवंडीतील सायझिंग उद्योग विविध मागण्यांसाठी एक आठवडा राहणार बंद



**भिवंडी/अभिजित हिरे**

शहरातील यंत्रमाग व्यवसायास पूरक व्यवसाय म्हणून ओळखला जाणारा सायझिंग व्यवसाय विविध मागण्यांसाठी तब्बल एक आठवडा बंद ठेवण्याचा निर्णय भिवंडी सायझिंग वेल्फेअर असोसिएशन या संघाचे अध्यक्ष अजय यादव यांनी घोषित केला आहे. भिवंडी शहरात १०३ सायझिंग कारखाने असून त्यामध्ये तब्बल ३००हुन अधिक सायझिंग मशीन दिवसरात्र सुरू असतात, परंतु या व्यवसायावर सुध्दा महागाई मुळे व कोरोना संकटामुळे गंडांतर आले असून या वावसायावर तब्बल २५ हजार मजूर कामगार अवलंबून आहेत. यंत्रमाग कारखानदारांना ज्याप्रमाणे वीज दरात सवलत दिली जाते तशी सवलत सायझिंग व्यवसायिकांना मिळावी, कच्चा मालाचे भाव वाढले असल्याने सायझिंग होणाऱ्या मालाची भाव वाढ झाली पाहिजे, त्या सोबतच सायझिंग च्या बॉयलर मध्ये ज्वलनासाठी दगडी कोळसा १० रुपये तर लाकडे ५ रुपये प्रति किलो मिळत असून त्यामुळे काही सायझिंग चालक भिवंडी सह कल्याण डोंबिवली ठाणे नवी मुंबई येथील भंगार व्यवसायिकांशी संधान बांधून २ रुपये प्रति किलो प्लास्टिक कचरा आणून रात्रीच्या सुमारास जाळत असल्याने त्यामुळे पर्यावरणात हवेत घटक धूर पसरून त्याचा नागरीकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून त्याचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी अशा मागण्या संघाच्या असून त्यासाठी एक आठवडा काम बंद आंदोलन करण्यात येत असल्याची माहिती अजय यादव यांनी दिली आहे.

# भिवंडीत कंटेनर आणि टेम्पो चोरीच्या गुन्ह्यात ८५ लाखांचा मुद्देमाल जप्त!

**भिवंडी/प्रतिनिधी**

तालुक्यातील दापोडा येथील गोदमातून कंटेनरमध्ये यॉर्क एक्स्पोर्ट, एस एस सोल्युशन, कनवर कॉन्व्हास, रिव्हाल्युशन ब्युटीया कंपनीचे टी शर्ट, स्वेटर, स्त्रियांचे कपडे व सौन्दर्य प्रसायदानाचे साहित्य भरून ठेवलेला असताना अज्ञात चोरट्यांनी बनावट चवीच्या मदतीने ७६ लाख रुपये किमतीचा माल व ५ लाख रुपयांचा कंटेनर घेऊन पोबारा केला होता, तर दुसऱ्या गुन्ह्यात पुर्णा गावाच्या हद्दीत चॉकलेट चा १ लाख १० हजार रुपये किमतीचा माल भरून ठेवलेला टेम्पो उभा असताना रात्रीच्या अंधारात तो अज्ञात चोरट्यांनी पळविल्याच्या घटना दोन दिवसात घडल्याने खळबळ उडाली असताना नारपोली पोलिसांनी चोरी झालेल्या ठिकाणचा मोबाईल तांत्रिक तपास करीत या दोन्ही गुन्ह्यात ५ आरोपींना अटक करीत त्यांच्या ताब्यातून एकूण ८५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



16 TO 22 AUGUST 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 14/08/2021 9:25 PM Page 1



### माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रियमंत्री विलासराव देशमुख यांचा स्मृतीदिन!

# देशमुख कुटुंबियाच्या वतीने आंदराजली अर्पण!



**लातूर/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रियमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमीत्त शनिवार दि. १४ ऑगस्ट २१ रोजी सकाळी बाभळगाव येथील विलास बागेत जाऊन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, सिनेअभिनेते रितेश विलासराव देशमुख यांनी विनम्र अभिवादन केले. कोरोना१९ सदयाचा प्रादूर्भाव व प्रतिबंधात्मक उपाययोजना ससुरू असल्यामुळे बाभळगाव येथील विलास बागेत होणारा सामुदायिक आदरांजली कार्यक्रम कौटुंबिकस्तरावर घेण्याचे देशमुख कुटुंबियांनी जाहीर केले होते. या अनुषंगाने सकाळी गर्दी टाळून कौटुंबिक पातळीवर मर्यादीत स्वरूपात आदरांजली अर्पन करण्यात आली. यावेळी राज्यमंत्री संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, खासदार ओमराजे निबाळकर, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, चेअरमन चेअरमन आबासाहेब पाटील, चेअरमन श्रीपतराव काकडे, चेअरमन सर्जेराव मोरे, दयानंद शिक्षण संस्थेचे लक्ष्मीनारायण लाहोटी, जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष श्रीशैल उटगे, चेअरमन व्ही.पी.पाटील, चेअरमन गणपत बाजूळगे, व्हा, चेअरमन विजय देशमुख, प्रताप पाटील, सुनिता आरळीकर, ऊषा कांबळे, उस्मानाबाद उपजिल्हाधिकारी प्रताप काळे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, अभय साळुंके, व्हाईस चेअरमन लक्ष्मण मोरे, ...पान ६ वर

## पालघर येथे स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन!





**पालघर/प्रतिनिधी**

इंग्रजां विरोधातील चलेजाव चळवळीत सहभागी झालेल्या पालघर तालुक्यातील पाच स्वातंत्र्य सैनिकांना हौतात्म्य प्राप्त झाले होते. त्यांचे पुण्यस्मरण व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पालघर येथील हुतात्मा स्तंभ येथे आज हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. सर्व मान्यवरांनी हुतात्मा स्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. आज पालघर शहरातील सर्व बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या होत्या. हुतात्मा चौकाजवळ जिल्ह्यातील काशिनाथ हरी पागधरे (सातपाटी), गोविंद गणेश ठाकूर (नांदगाव), रामप्रसाद भीमाशंकर तिवारी, (पालघर), सकूर गोविंद मोरे (सालवड), रामचंद्र महादेव चूरी (मुरबे) यांना १९४२च्या स्वातंत्र्य लढ्यात याच दिवशी हौतात्म्य् आले होते. आज या हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी येथील हुतात्मा चौकात पालघर जिल्हा परिषद अध्यक्षा वैदही वाढाण, पालघरचे खासदार राजेंद्र गावित, पालघरच्या नगराध्यक्ष डॉ. उज्वला काळे, आमदार श्रीनिवास वनगा, जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी सिध्दाराम सालिमठ, पोलिस अधिक्षक दत्तात्रेय शिंदे यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी प्रतिनिधी, प्रांताधिकारी, तहसिलदार, विविध विभागाचे अधिकारी वर्ग, स्वातंत्र्य सैनिक, नागरिक, विविध मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## कोकणातील पूरग्रस्तांना वसई-विरार मधून मदतीचा हात



**विरार/प्रतिनिधी**

नुकत्याच कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रचंड अत्तीवृष्टी आणि भूसंखालन होऊन प्रचंड हानी झाली. कोकणातील नद्यांना तर महापूर येवून अनेक गावे आणि चिपळूण, राजापूर सारखी मोठी शहरे पाण्याखाली गेली. या पुरात लोकांची घरेदारे संसार सर्व काही उध्वस्त झाले. या पूरग्रस्तांना राज्याच्या सर्व भागातून सध्या मदतीचा ओघ सुरु असून वसई, विरार, नालासोपारा येथील जनतेनेही कपडे, अन्न, धान्य, रोख रक्कम तसेच इतर संसार उपयोगी वस्तूंची मदत केली. वसई-विरार मधील सामाजिक संघटना राजकीय पक्ष यांनी देखील आर्थिक मदत केली. विरार शहर शिवसेना जनसंपर्क कार्यालय प्रमुख निलेश कानकोटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांनी जनतेला मदतीचे आव्हान केले होते. त्याला प्रतिसाद देवून जनतेने भरघोस मदत दिली आणि ती मदत घेऊन ९ ऑगस्ट रोजी कार्यकर्ते कोकणात पोहचले. तेथील नागरिकांच्या मदतीने जी गावे पूरग्रस्त होती त्यांची पाहणी करून त्यातील प्रामुख्याने आसंपोई, शिरगाव, किंजालघर, दडली कांबळे भूयीकुंद आणि मात्वान मोहल्ला या गावांना मदतीचा हात दिला. या संकल्पामध्ये जितेंद्र चौधरी, रत्नदीप सावंत, संजय टेबंवलकर, सुहास पाटील, दत्तात्रय पाटील, आनंद तावडे, अरविंद पटेल, सुशांत देवनाथ, मारुती कामत, अभय शेनॉय, जगदीश तेलंगडे, सुनील पाटील, ऐश्वर्या तेलंगडे, मृदुला वाटवे, मांजरेकर, लीना पाटील, मानसी घरत, अर्चना पवार यांनी मोलाची मदत केली. तसेच मदत वाटप करण्याकरिता महाड उपतालुका प्रमुख सुनील देशमुख, विभाग प्रमुख समीर शिंदे आणि नाना कळमकर यांनी उपस्थित राहून योग्य ती मदत पूरग्रस्तांना पोहचवली.

## बहिणीच्या स्मृतीप्रित्यर्थ राममंदिरासाठी वंगवाड कुटूबियांकडून एक लाखाचा निधी

**लातूर/प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेचे माजी चेअरमन तथा पंचायत समितीचे माजी सदस्य जनार्दन वंगवाड यांनी आपली बहीण कै.मित्रवंदा किशनराव व्यंजने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राम मंदिराच्या उभारणीसाठी १ लाख रुपयांचा निधी डॉ. अशोकराव कुकडे काका यांच्याकडे सुपूर्द केला. औसा पिठाचे सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ममदापूर येथे वंगवाड यांच्या निवासस्थानी हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सुर्याजी शिंदे पाटील, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह नितीन शेटे, अतुल ठोंबरे, पत्रकार जयप्रकाश दगडे,डॉ.बाहेती, सरपंच चंद्रकांत पासमे, सॉल्व्हंट प्लँटचे शांतीसेठ साबू,पत्रकार शशिकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी वंगवाड परिवाराच्या वतीने आदरणीय कुकडे काका व सद्गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्यासह मान्यवरांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. वंगवाड परिवाराच्या वतीने पाद्यपूजा करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन



बाळासाहेब देशपांडे यांनी केले. यावेळी प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना जनार्दन वंगवाड म्हणाले की, माझी धाकटी बहीण कै.मित्रवंदा व्यंजने या अध्यात्मिक क्षेत्रात होत्या. त्यांनी आयुष्यभर दानधर्म केला. आजोळ, माहेर आणि सासर या तीन गावांसह अनेक ठिकाणी अन्नदान, वस्त्रदान व सोने दान केले. त्यांची वारी कधीही चुकली नाही. बालपणी वडिलांचे निधन झाले. काही वर्षांनंतर आईही निवर्तली. बहिणीनेच मला आईचे प्रेम आणि वडिलांचे बळ दिले.या पाठबळावरच राजकारण व समाजकारणात मी सक्रिय राहिलो. विलासराव देशमुख साहेब यांनी राजकीय क्षेत्रात सन्मानाची पदे दिली. रोजगार हमी योजनेचा चेअरमन, पंचायत समितीचा सदस्य अशी सन्मानाची पदे मला भूषविता आली. विलासराव देशमुख साहेब यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळाली. माझ्यासाठी बहिणीचा अध्यात्मिक वारसा अत्यंत मोठा आहे. त्याची उतराई म्हणून बहिणीच्या स्मरणार्थ राम मंदिरासाठी निधी देण्याचा संकल्प मी केला होता. आदरणीय कुकडे काकांनी राम मंदिराच्या उभारणीसाठी आयुष्यभर कार्य केले.या प्रयत्नांमुळेच राम मंदिराचे भूमिपूजन झाले आणि आज उभारणी सुरू आहे. त्यांच्या हाती हा निधी सुपूर्द व्हावा अशी माझी भावना होती. ही भावना मी गहिनीनाथ महाराज औसेकर व अतुल ठोंबरे यांच्याकडे व्यक्त केली होती. कुकडे काका व गहिनीनाथ महाराज हे दोन्ही संत आपल्या घरी यावेत, अशी भावना होती. ती इच्छा आज पूर्ण झाली, असे त्यांनी सांगितले. यावेळी वंगवाड कुटुंबियांमार्फत गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या उपस्थितीत कुकडे काकांकडे १ लाख रुपयांचा निधी सुपूर्द करण्यात आला. या कार्यक्रमात गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले.कुकडे काका व गहिनीनाथ महाराजांनी आशीर्वचनपर मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शेळके मामा यांनीही राम मंदिराच्या उभारणीसाठी निधी सुपूर्द केला. या कार्यक्रमास प्रकाश पाटील वांजरखेडकर, अमोल पाटील, माजी जिप सदस्य अशोकराव पाटील, शेळके मामा,पंचायत समितीचे माजी उपसभापती राजेसाहेब पाटील, महादेवअप्पा गिरवलकर, नागोराव उटीकर, विकास कारखान्याचे माजी संचालक सतिष पाटील, दिनकरराव वीर, सूर्यकांत वीर, बालाजी नागरगोजे, ज्ञानोबा बेंबडे, व्यंकटसिंह राजपुत यांच्यासह वंगवाड परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

## कास्ट्राईब शिक्षक संघटनेची जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात बैठक

**वाडा/प्रतिनिधी**

कास्ट्राईब शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य पालघर जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हा परिषद शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख यांच्या प्रलंबित प्रश्नावर बैठक मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांच्या दालनात झाली. या बैठकीत सर्व प्रश्नावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ह्या सर्व प्रश्नांची उकल या दिवाळीपूर्वी करण्यात येईल असे आश्वासन दिले.

पदोन्नतीवर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणाले की, सेवा ज्येष्ठता यादीचे काम सुरू असून दिवाळीच्या आत मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी २,३ व अभावित केंद्र प्रमुख यांची पदे भरण्यात येतील. सर्वांना पदोन्नतीची भेट देऊन दिवाळी गोड केली जाईल. तसेच




विज्ञान पदवीधर रिक्त पदभरती, चट्टोपाध्याय वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रस्ताव तालुक्यातून प्राप्त असून अंतिम मंजूरी लवकरच देण्यात येणार आहे.त्याच बरोबर पेसा क्षेत्रात शिक्षक भरती करून लवकरच विकल्प विपरीत प्रश्न निकाली काढला जाईल. या सर्व प्रश्नावर सकारात्मक चर्चा होऊन मुख्य कार्यकारी अधिकारी सालीमठ साहेबांनी सर्व प्रश्न लवकरच सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. सीएमपी प्रणाली पालघरला सुरू केल्याबद्दल संघटनेकडून मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धराम सालीमठ यांचे आभार मानण्यात आले. मागासवर्गीय केंद्र प्रमुख यांच्यावर प्रशासकीय बदलीत झालेला अन्याय दूर करण्यासाठी लवकरच सुनावणी लावण्यात येणार आहे.विकल्प विपरीत शिक्षकाची भविष्य निर्वाह निधी रक्कम वर्ग करून, व्याज जमा करावे, पगारातून कापलेली ...पान ६ वर

### मीरा-भाईंदर ऑक्सजिन प्लांटचे ऑनलाईन लोकार्पण

## ऑक्सिजन बाबतीत महाराष्ट्र देशातील पहिले स्वयंपूर्ण राज्य ठरेल -मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**भाईंदर/प्रतिनिधी**

दुसऱ्या कोरोना लाटेमध्ये ऑक्सिजनअभावी विविध अडचणींचा सामना रुग्णाला करावा लागला. आता संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये ऑक्सिजनची कमतरता भासू नये यासाठी प्रत्येक जिल्ह्याने ऑक्सजिनबाबत स्वयंपूर्ण व्हावे यासाठी युद्धपातळीवर काम चालू आहे महाराष्ट्र हे देशातील ऑक्सजिन बाबतीत स्वयंपूर्ण होणारे पहिले राज्य ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. मीरा-भाईंदर येथील ऑक्सजिन निर्मिती प्रकल्पाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण करण्यात आले त्यावेळी मुख्यमंत्री श्री.ठाकरे बोलत होते. यावेळी नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे आमदार प्रताप सरनाईक मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे नगरसेवक आदी उपस्थित होते. मीरा-भाईंदर महानगरपालिकेने विविध लोकोपयोगी विकासकामे केलेली आहेत, यामध्ये जलतरण तलाव तसेच नाट्यगृह यांचे काम प्रगतिपथावर आहे. मीरा-भाईंदर भागांमध्ये कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी आमदार प्रताप सरनाईक यांच्या कामाच्या माध्यमातून लोकोपयोगी कामे करण्यात आली आहेत आणि भविष्यामध्ये केली जाणार आहेत असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. कोरोना काळामध्ये सर्वात प्रथम ठाणे जिल्ह्याने ऑक्सिजन प्रकल्प उभारला होता यामुळे ठाणे जिल्ह्याने ऑक्सिजन बाबतीत स्वयंपूर्ण झालेला पहिला जिल्हा होण्याचा मान मिळविला आहे. मागील लाटेचा अनुभव पाहता संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये कोणताही रुग्ण ऑक्सिजनपासून वंचित राहणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला. कोरोनामुक्त गाव ही संकल्पना राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात राबविण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाने आपले गाव कोरोनामुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न केले तर महाराष्ट्र नक्कीच कोरोनामुक्त होईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री.ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला.